MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे

व्ही. पी. एम्.

# दिशा



वर्ष दहावे/अंक ८/जुलै २००९

## संपादकीय

## 'गुरू' महात्म्य

समाज आपल्या संवादासाठी जी अनेक माध्यमे वापरतो, त्यांत भाषा हे एक महत्त्वाचे माध्यम आहे. भाषा म्हणजे मुखावाटे व्यक्त झालेला नियंत्रित, अनियंत्रित ध्वनी. सुरुवातीला ही भाषा बोली असते. पुढे या आवाजांकरता चिन्ह निर्माण केली जातात. या चिन्हांचे वर्गीकरण होते. चिन्हापुढे चिन्ह ठेवून त्यांचा शब्द बनतो. थोडक्यात बोली स्वरूपातील आवाजांचे परिवर्तन लिखित संवादात होते. ही सर्व चिन्हे अमूर्त व निरर्थक असतात. त्यांना अर्थाचे जे वजन प्राप्त होते, ते त्या संस्कृतीमधून आलेले असते. भाषेतील धातू आणि व्युत्पत्तीचा शोध हा खरे म्हणजे त्या धातूला व त्यातून तयार होणाऱ्या शब्दांना प्राप्त झालेल्या अर्थामागील प्रवास शोधण्याचा प्रयत्न असतो. हाच प्रकार म्हणी व वाक्प्रचार यांचाही आहे. प्रत्येक म्हण ही केव्हातरी जीवनात घेतलेला अनुभव असतो व त्याचे परिवर्तन विशिष्ट आशयात होते. उदाहरणच द्यायचे झाले तर, 'अंथरूण पाहून हातपाय पसरावेत' या म्हणीचे पाहता येईल. याचा अर्थ अंथरुणाची लांबी रुंदी शरीराच्या प्रमाणात असेल, तर ते अंथरूण पुरेसे ठरते. हा सार्वत्रिक अनुभव आहे. त्यातून ध्वनित करायचा अर्थ असा आहे की, आपल्या आर्थिक कुवतीनुसार खर्च करावा.

मानवी अस्तित्वाची लाखो वर्षे गृहीत धरता, लहानमोठ्या भाषिक समाजांनी आपापसातील संवादांतून असे अनेक धातू जन्माला घातले. या सर्व व्यवहारांचा जेव्हा शास्त्रीय अभ्यास होतो, तेव्हा त्यांच्या विद्याशाखा निर्माण होतात. मग या शब्दांचे उच्चारशास्त्र व व्याकरणशास्त्र होते. अगदी थोडक्यातच समजावून सांगायचे तर, 'वडील' व 'वखार' या शब्दांतील 'व' हा जेव्हा एका विशिष्ट क्रमाने शब्दांच्या पेडीमध्ये गुंफला जातो, तेव्हा त्या दोन तीन अक्षरांमधून (शब्दांमधून) अर्थ निर्माण होतो. तो त्या भाषिक समाजामध्ये समजतो. वस्तुत: त्या सुट्या अक्षरांना स्वत:चा अर्थ नसतो.

भाषेचा हा व्यक्त व अव्यक्त सांस्कृतिक व्यवहार हा समाजाच्या भौतिक, सांस्कृतिक अस्तित्वाचे गणित मांडू शकतो. १७८४ साली भारतात आल्यावर सर विल्यम जोन्स यांनी संस्कृत, ग्रीक व लॅटिन या भाषांतील शब्द व त्यांतून व्यक्त होणारा अर्थ यांमधील साधर्म्य दाखवले. भौगोलिक दृष्ट्या इतक्या भिन्न प्रदेशांत राहणाऱ्या लोकांमध्ये साम्य कसे निर्माण झाले, हा पुढचा महत्त्वाचा प्रश्न निर्माण झाला. त्यातूनच संस्कृतचा अभ्यास व संस्कृत भाषेची रचना, व्याकरण यांची श्रीमंती बघून एका व्यापक तुलनात्मक भाषाशास्त्राचा जन्म झाला. दुर्दैवाने या अभ्यासावर वंशशास्त्राचा प्रभाव पडला व त्यातून अनेक धोकादायक निष्कर्ष बाहेर आले.

(कव्हर क्र. २ वर)

मुखपृष्ठावरून - संपादकीय

आज आपल्याला विचार करायचा आहे तो 'गुरु' महात्म्याचा. अलिकडेच गुरुपौर्णिमा झाली. घरादारापासून दूरदर्शनपर्यंत 'गुरु' महात्म्याचे वर्णन केले गेले. कला क्षेत्रात तर जवळ जवळ प्रत्येक गल्लीत 'गुरू' शोधता येईल, इतकी गुरूंची गर्दी झालेली दिसते. नमस्कार चमत्कार यांचे अमाप पीक त्या दिवशी बघायला मिळाले. दहीहंडीपासून नवरात्रीपर्यंत आपण सणांचे जे व्यावसायिकीकरण, विकृतीकरण व अवमूल्यन केले आहे, तोच प्रकार 'गुरू' या संस्थेचाही झालाय. वर भाषारचनेचे जे विवेचन केले आहे ते एवढ्या करताच की, 'गुरू' हा शब्द, एक सांस्कृतिक संस्था आहे. तो पेशा किंवा व्यवसाय नाही. आजचा शालेय, महाविद्यालयीन शिक्षक काय किंवा गायन, वादन शिकवणारे मास्तर काय, हे शुद्ध व्यावसायिक आहेत. आपला उदरनिर्वाह व अर्थकारण या केंद्राभोवती त्यांचे सर्व आचार विचार व व्यवहार होत असतात. त्यात काही गैर आहे अशातलाही भाग नाही. आपल्या क्षमता व कुवतीप्रमाणे त्यांचा अर्थव्यवहार चालू असतो. ते मिळवण्यासाठी अनेक युक्त्या, क्लृप्त्या, ज्यांना व्यवहार म्हटले जाते, यांचाही मार्ग अवलंबला जातो. पण म्हणून ते 'गुरू' होत नाहीत.

आज समाजामध्ये माहितीचे संक्रमण म्हणजे शिक्षण ही संकल्पना दृढमूल झालेली आहे. यात माहिती देणारा तो शिक्षक किंवा 'गुरू' व माहिती घेणारा तो विद्यार्थी अशी विभागणी झाली आहे. माणसाला एखाद्या विद्याशाखेची जेवढी गरज असते तेवढीच त्याला तरल, अभिरुची संपन्न होण्याकरता इतरही अनेक गोष्टी शिकण्याची आवश्यकता असते. निव्वळ माहितिच्या देवाणघेवाणी मध्ये तशी योजनाच नसते. अशा शिक्षणाला एक यांत्रिकी स्वरूप प्राप्त झाले आहे. माणसाच्या जन्माबरोबरच, राग, लोभ, मद, मत्सर, मोह, स्वार्थ हे त्याचे षड्रिपूही जन्माला येतात. या सर्व प्रेरणा नैसर्गिक आहेत. औषधशास्त्रामध्ये विष हे सुद्धा औषध असते व औषध हे देखील विष होऊ शकते. यांमधील फरक हा त्याच्या वापरण्याच्या मात्रेमध्ये असतो. या सर्व षड्रिपूंचेही तेच आहे. प्रत्यक्ष जीवनामध्ये यांचा वापर योग्य मात्रेत झाला तर एका 'सभ्य' समाजाची निर्मिती होते.

हे संतुलन साधण्याची प्रक्रिया दिसते तेवढी सोपी नसते. स्वत:मध्ये असे संतुलन आणण्याकरता समोर आदर्श व्यक्ती लागते, की जी आपल्या प्रत्यक्ष जीवनक्रमातून अशा संतुलित वागण्याचे प्रत्यक्ष अनुभव देत असते. व्यक्तिश: या गोष्टी फार कठीण असतात. पण गुरू मात्र त्या सर्व कसरती लीलया पार पाडत असतो. याकरता त्याला स्वत:च्या जीवनशैलीवर मोठ्या प्रमाणात नियंत्रणे आणावी लागतात. कारण 'आदर्श' काय हे त्याला प्रत्यक्ष दाखवून द्यावयाचे असते. ते चर्चा, तत्त्वज्ञानापलीकडे नेऊन अनुभवजन्य करायचे असते. ही त्याची किमया त्याला आदर प्राप्त करून देते. म्हणजे गुरू होण्याकरता जेवढी माहितीची आवश्यकता असते, त्यापेक्षा किती तरी अधिक तो प्रत्यक्षात आचरणात आणत असलेल्या जीवनमूल्यांची असते. आयुष्याची पहिली काही वर्षे प्रत्येक मुलाचा 'गुरू' हे त्याचे 'पालक' असतात. 'अनुकरण' करणे ही प्रत्येक मुलाची स्वाभाविक प्रेरणा असते. यामुळे आई-वडिलांनी अनुकरणशील होणे आवश्यक असते. आपल्या हालचाली, वागणे, बोलणे, चालणे या सर्वांवर नियंत्रण आणावे लागते. दीर्घ सहवास व संपर्कामुळे नकळत मुलांवर आईवडिलांचे संस्कार होत असतात.

थोडक्यात, 'गुरू'पद प्राप्त होणे ही साधी गोष्ट नाही. दुर्दैवाने अनुकरणशील गुरू या समाजात दुर्मिळ झाल्यामुळे बेगडी गुरूंचे पीक आले आहे. आजच्या समाजाची ही खरी शोकांतिका आहे. संतांनी उगाच म्हटले नाही, 'बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले।'

**डॉ. विजय बेडेकर**




**वर्ष दहावे / अंक ८ / जुलै २००९**

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
श्री. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १५ वे / अंक १ ला)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
Email : perfectprints@gmail.com

## *अनुक्रमणिका*


| | | | |
|---|---|---|---|
| १) | योग्य चिंतन आणि संयम | श्री. यशवंत माने | ३ |
| २) | ये आकाशवाणी है ... | श्रीमती आशा भिडे | ६ |
| ३) | संत गोरोबा कुंभार | श्री. शं. बा. मठ | ८ |
| ४) | एका वादळी व्यक्तिमत्त्वाची ओळख | श्री. विश्वनाथ शेंड्ये | १२ |
| ५) | प्रकाशाची वाट (पुस्तक परिचय) | श्री. सुरेंद्र लागू | १५ |
| ६) | भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना | श्री. यशवंत साने | १८ |
| ७) | निष्ठावान ग्रंथोपासक - शरद जोशी | श्री. जयंत गोखले | २७ |
| ८) | गीतार्थ विलसित (साहित्य जगत) | श्री. शरद जोशी | २९ |
| ९) | ऑक्सफर्डच्या निसर्ग-इतिहास संग्रहालयाला भेट | डॉ. सुधाकर आगरकर | ३१ |
| १०) | परिसर वार्ता | संकलित | ३४ |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# आवाहन

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे ही संस्था ठाण्यात गेली ७५ वर्षांहून अधिक काळ शिक्षण क्षेत्रात कार्य करीत आहे. मराठी व इंग्रजी शाळांबरोबरच कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, व्यवस्थापन शाखांची महाविद्यालये, तंत्रनिकेतन व प्रगत अभ्यास केंद्र अशा सर्वांगीण शिक्षणाची सोय संस्थेने केली आहे. पाठ्यपुस्तकीय शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या अंगचे कला, क्रीडा इ. क्षेत्रातील गुण विकसित व्हावेत म्हणून विविध उपक्रम संस्था राबवीत आली आहे. या सर्वांच्या परिणामस्वरूप संस्थेचे विद्यार्थी अभ्यास व अभ्यासेतर परीक्षा व स्पर्धांत उत्तम यश मिळवीत असून संस्थेचे माजी विद्यार्थी समाजात विविध क्षेत्रांत कार्यप्रवण आहेत.

दूरदर्शन, सिनेमे व सवंग नियतकालिके भोगवादी, नीतीहीन संस्कृतीचा प्रसार करण्यात अग्रेसर आहेत. याउलट विधायक, संस्कृतिरक्षक विचार पोचवतील अशी माध्यमे अल्पसंख्य आहेत. संस्कारक्षम विद्यार्थ्यांना, वाचकांना, नागरिकांना वैचारिक खाद्य पुरवावे, त्यांच्यात ईर्षा निर्माण व्हावी व त्यांनी अर्थार्जन व व्यावसायिक यशाबरोबरच सामाजिक कार्य साधावे, या उद्देशाने मंडळाने **'दिशा'** हे नियतकालिक जुलै १९९६ पासून सुरू केले आहे.

**या मासिकाचे वर्गणीदार होऊन, या मासिकात जाहिरात देऊन किंवा लेख पाठवून आपण आमच्या कार्याला हातभार लावावा ही विनंती !** तसेच, आपल्या अमूल्य देणग्या देऊनही आपण दिशासाठी हातभार लावू शकता.

संपादक, दिशा
**विद्या प्रसारक मंडळ,**
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०

**टीप** : वर्गणी /जाहिरात वा देणगीची रक्कम धनादेशाने पाठवावी. धनादेश (चेक) **''विद्या प्रसारक मंडळ A/c दिशा''** या नावाने पाठवावा.

**वार्षिक वर्गणी रु. २५०/-**

अंकाची किरकोळ विक्रीची किंमत रु. २५/- फक्त.

वर्गणी पाठविताना आपला पूर्ण पत्ता, टपाल सूची क्रमांक (पिनकोड नंबर) व दूरध्वनी क्रमांक कळवावा.

# योग्य चिंतन आणि संयम

*चिंतनाचे महत्त्व आणि संयमाचे महत्त्व हे आपण मान्य करतो. त्यासाठी काय करायला हवे याचा हा विचार- संपादक*

ज्या गोष्टी आपल्याला हव्या असतात, ज्या गोष्टी मिळवण्यासाठी आपण प्रयत्न करीत असतो अशा गोष्टी आपल्याला सहजासहजी मिळत नाहीत. परंतु ज्या गोष्टी नको असतात अशा गोष्टी मात्र न मागताच मिळत असतात. त्यासाठी कोणतेही प्रयत्न करावे लागत नाहीत किंवा कष्ट घ्यावे लागत नाहीत. प्रत्येक व्यक्तीला आयुष्यात सुख, शांती हवी असते पण ते मिळण्याऐवजी दु:ख न मागताच मिळत असते. आपल्याजवळ खूप धनदौलत, पैसा, संपत्ती असावी असे वाटत असते, पण नशीबी मात्र गरिबीच असते. मनावर नियंत्रण रहावे, त्यावर संयम रहावा म्हणून आपण कितीही प्रयत्न केला तरी ते शक्य होत नाही. मनावरील नियंत्रण केव्हा सुटते ते आपल्याला कळतही नाही. मन नेहमी इकडून तिकडे सारखे भटकत असते. ते केव्हाही स्थिर दिसून येत नाही. आपल्याला दीर्घायुष्य असावे असे वाटते ; एवढेच काय आपल्याला मरण नकोच वाटत असते. पण प्रत्येकाला मृत्यू हा अटळ असतो. प्रत्येकाला हे जग सोडून जावे लागतेच. जे जे आपल्याला हवे हवेसे वाटते ते ते मिळवण्यासाठी आपण प्रयत्नही करीत असतो पण ते मिळत नाही. घडते मात्र उलटेच. पण हे असे का घडते, याचा आपण विचारच करीत नाही. आपण विचार करीत नाही म्हणून तर ते आपल्याला समजत नाही.

प्रयत्न न करता नको त्या मिळत असणाऱ्या गोष्टीपासून दूर रहाण्याचा मार्ग म्हणजे योग्य चिंतन आणि संयम होय. आपल्या समोर अनेक अडचणी किंवा समस्या येत असतात. त्यावर योग्य चिंतन न करता, केवळ चिंता करीत असतो. त्यावर अनिष्ट चिंतन करीत असतो. आणि अनिष्ट चिंतन करण्यातच आपण आपला अधिक वेळ घालवत असतो. आपल्यासमोर कोणती समस्या आहे? त्या समस्येचे मूळ काय? ती समस्या का निर्माण झाली? त्यावर उपाय कोणता आहे? त्यासाठी काय केले पाहिजे? याचा आपण विचारच करीत नाही. केवळ आलेल्या समस्येवर चिंता करीत असतो. त्या संदर्भात काळजी करीत असतो. चिंता ही माणसाला जिवंतपणीच जाळत असते. म्हणून, झालेल्या समस्येवर चिंता न करता चिंतन केले पाहिजे. काही पालक आपला मुलगा वाईट मार्गाला लागला किंवा वाईट संगतीला लागला म्हणून केवळ चिंता करीत बसतात. त्यासंदर्भात काळजी करतात. पण आपला मुलगा वाईट संगतीला का लागला? त्याची कारणे कोणती? त्या कारणावर उपाय कोणते? आपला मुलगा या कारणांपासून दूर रहावा म्हणून कोणते प्रयत्न करायला हवेत याचा ते विचारच करीत नाहीत. या ठिकाणी आपण एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी ती म्हणजे समस्या कोणतीही असो, त्या समस्येचे मूळ शोधून काढायला हवे. आणि त्या समस्येच्या मुळावरच घाव घालायला हवा. तरच ती समस्या कायमस्वरूपी मिटते. अन्यथा काही दिवसानंतर ती पुन्हा नव्या जोमाने उद्‌भवते. ज्याप्रमाणे आजाराचे मूळ शोधून त्यावर योग्य उपाय केला नाही तर तो आजार पुन्हा उद्‌भवतो त्याचप्रमाणे समस्येचेही मूळच नष्ट करायला हवे. परंतु त्यासाठी योग्य चिंतन हवे असते.

योग्य चिंतनाबरोबरच आपण प्रत्येक गोष्टीवर संयम ठेवला पाहिजे. आपण काय खाल्ले पाहिजे, किती खाल्ले पाहिजे, केव्हा खाल्ले पाहिजे, कसे खाल्ले पाहिजे यावर संयम ठेवायला हवा. आपल्या शरीराला कशाची गरज आहे हे पाहूनच आपला आहार असावा. या सर्वांवर आपण संयम

ठेवला नाही तर अनेक प्रकारच्या व्याधी निर्माण होतात. अनेक रोगांना आपण आमंत्रणच देत असतो. त्याचबरोबर आपण आपल्या वाणीवर / बोलण्यावर संयम ठेवला पाहिजे, मनावर आणि धन प्राप्तीवरही संयम ठेवायला हवा. धनाची प्राप्ती जेवढी गरज आहे तेवढीच करावी. अनावश्यक धनप्राप्ती करू नये. या सर्व गोष्टीवर आपण संयम ठेवत नाही; म्हणूनच तर आपण नको त्या गोष्टी मिळण्यास नकळत एक प्रकारे निमंत्रणच देत असतो. म्हणून प्रत्येक व्यक्तीजवळ संयम असणे महत्त्वाचे असते. आणि नेमका संयम ठेवणेच आपणास जमत नाही. कारण प्रत्येक गोष्टीवर संयम ठेवण्यासाठी सर्वांत प्रथम गरज असते ती मनःस्थिती ठीक ठेवायची. आपली परिस्थिती बदलण्यासाठी प्रथम आपली मनस्थिती बदलायला हवी. मनःस्थिती ठीक असेल तरच आपण योग्य विचार करू शकतो, योग्य चिंतन करू शकतो.अन्यथा अनिष्ट चिंतन करण्यातच आपला वेळ जात असतो. मनःस्थिती सहजासहजी बदलता येत नाही. त्यासाठी खूप बौद्धिक मेहनत घ्यावी लागते, कष्ट घ्यावे लागतात. मनःस्थिती बदलण्यासाठी सर्वसाधारणपणे पुढील गोष्टींची आवश्यकता असते.

**१) आपले मन सदैव परमेश्वराजवळ असावे :**

आपले मन सदैव परमेश्वराशी जोडले गेलो पाहिजे. मन आणि परमेश्वर यांचे घनिष्ट सबंध ठेवावेत. मनात नेहमी परमेश्वराचाच विचार असावा. मन परमेश्वराच्या सहवासात ठेवण्यासाठी दररोज भजन, किर्तन, नाम, जप, तप यांच्याद्वारे प्रयत्न करता येतो, आणि तो करावा.

**२) घरात नेहमी जप, पूजा करावी :**

आपल्या घरात कितीही संकटे आली, कितीही वाद-विवाद निर्माण झाले तरी दररोज नित्यनियमाने पूजा करावी. कारण अशा संकटातून बाहेर परमेश्वरच काढत असतो. आणि संकटसमयी आपण परमेश्वराची आठवण ठेवतो किंवा नाही, हे परमेश्वर पहात असतो. ज्या घरात नित्यनियमाने पूजा, भजन, किर्तन, जप, तप चालते अशा घरातच परमेश्वराचे वास्तव्य असते.

**३) कोणतेही काम प्रेमाने आणि मन लावून करावे :**

अगदी लहानातील लहान कामही मनापासून आणि प्रेमाने करावे. जे काम हाती घेतले आहे ते आवडीने करावे. करण्यात येणाऱ्या कामामध्ये कौशल्य दाखवले पाहिजे. आपण जे काही करत आहोत, ते आपल्यासाठी नसून परमेश्वरासाठी करीत आहोत ही भावना मनात असावी.

**४) रहाणी साधी असावी :**

आपले रहाणीमान हे साधी रहाणी आणि उच्च विचारसणी अशा प्रकारचे असावे. गर्भश्रीमंत व्यक्ती पैशाने श्रीमंत असतात पण मनाने ते दरिद्रीच असतात. म्हणून त्यांच्याकडे धन, दौलत सर्व काही असूनही ते सुखी दिसून येत नाहीत. आपले रहाणीमान आपल्या पोशाखातून न दाखवता ते आपल्या विचारांतून दिसून आले पाहिजे.

**५) लहान गोष्टीतही आनंद शोधावा :**

आपल्या हाती कोणतेही काम असो, त्यामध्ये आनंद शोधता आला पाहिजे. अगदी दु:खात आनंद शोधण्याची कलाही आपणास अवगत असावी. आलेले दु:ख हे कायम स्वरूपी नसते. प्रत्येक दु:खानंतर सुखाची चाहूल लागतेच. म्हणून दु:खातही आनंद शोधावा.

**६) सर्वांवर प्रेम करावे :**

ज्या ज्या व्यक्तीशी आपला संपर्क येतअसतो, त्या सर्व व्यक्तींशी आदरयुक्त, प्रेमभावाने वागले पाहिजे. ज्यांच्या जवळ गोड शब्द असतात, अशी व्यक्तीच अनेक माणसे जोडू शकते. गोड बोलण्यासाठी कसलाही खर्च करावा लागत नाही. म्हणून मुखातून नेहमी शुभ शब्दच काढावेत. आपले बोलणे दुसऱ्यांना सत्संग वाटावे.

---

संकटे टाळणे म्हणजे आव्हानांपासून पळ काढणे होय.

**७) संगत चांगली असावी :**

आपण नेहमी चांगल्या व्यक्तींशीच संगत करावी. ज्या व्यक्तीचे आचार, विचार आणि उच्चार श्रेष्ठ वाटतात अशा व्यक्तींच्या संपर्कात जास्त वेळ घालवला पाहिजे. अशाने आपल्यामध्येच बदल घडून येत असतो. म्हणून आपल्यात चांगले बदल घडवून आणायचे असतील, तर प्रथम संगत चांगली असावी. माणूस कसा आहे हे त्याच्या संगतीवरून कळून येत असते.

**८) धनाचा लोभ नसावा :**

बारकाईने विचार केल्यास असे दिसून येईल की, आपल्यावर जी अनेक संकटे येतात ती धनाच्या अधिक मोहामुळेच. अधिक धन जमा करण्यासाठी आपली वाटेल ते करण्याची तयारी असते. त्यामुळे घर, शरीर यावर ताण येऊन अनेक प्रकारच्या संकटांना आपण निमंत्रणच देत असतो. आज अनेक लोक धनाच्या मोहामुळे बरबाद झाल्याचे आपणास दिसून येतात. धनप्राप्तीसाठी वाममार्गाला लागल्याचे दिसून येतात. म्हणून आपल्या उदरनिर्वाहासाठी जेवढे आवश्यक आहे तेवढेच धन जमा करावे त्याच्या मोहात पडू नये.

**९) मनात विकार नसावेत :**

आपली मनःस्थिती चांगली ठेवण्यासाठी सर्वांत प्रथम आपण मनातील सर्व विकार काढून टाकले पाहिजेत. आपले मन आपण नेहमी शुद्ध ठेवण्याचा प्रयत्न करावा. म्हणजेच राग, लोभ, मोह, माया या सर्वांवर संयम आणि नियंत्रण ठेवले पाहिजे.

**श्री. यशवंत माने**
अबोली, बी - १०३, सुभाष रोड,
कुंभारखान पाडा,
डोंबिवली (प.), जि. ठाणे

●●●

### *रोजनिशीचे एक पान*

आज सोमवार दि. १५ जून २००९. एकोणतिसाव्या वर्षातील शालेय सेवेचा पहिला दिवस. योगायोग असा की, हा शाळेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाचा प्रारंभ. नव्या उत्साहाने मी शाळेत प्रवेश केला. आजचा दिवस माझ्या संपूर्ण शालेय जीवनातील आणि अध्यापनाच्या दिवसांतील अविस्मरणीय आहे.

विद्या प्रसारक मंडळाचे सर्वच मान्यवर, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक, विद्यार्थी यांच्या ऋणानुबंधाच्या गाठी आज भरभक्कम झाल्या, कार्याची जाणीव वाढती झाली. सुवर्णमहोत्सवाचा योग आनंदाची कमळे फुलवून गेला. जल्लोशही नवा झाला झाला होता. मुलांच्या कलागुणांची ताकद, ध्यास पुढे नेण्यासाठी अधिक काही करायलाच हवे, हे सांगती झाली. हे सारे पाहताना -

"हिचे पुत्र आम्ही, हिचे पांग फेडू,
हिला बैसवू वैभवाच्या शिरी"

हा एकच विचार मनात येत होता. गुणवत्ता टिकविण्यासाठी, वाढविण्यासाठी लक्षावधी रुपयांची गरज नाही, तर मनापासूनच्या कष्टांची आहे.

माझ्या जीवन घडणीचा हा महत्त्वाचा कालखंड आहे. याचा अभिमानही वाटला. आयुष्यातला धन्य क्षण! विद्या प्रसारक मंडळाच्या मांदियाळीची ही मूर्तिमंत प्रेरणा नवा स्त्रोत देत राहो. डॉ. वा.ना. बेडेकरांचे अनमोल आशीर्वाद सारे करवून घेवोत ही प्रार्थना! या दिवसाला मोल नाही, तोड नाही. मी खूप श्रीमंत आहे.

हे चिमण्यांनो, गरूड व्हा . . . , गरूड व्हा . . .

**सौ. उषा कळमकर**
मुख्याध्यापिका
डॉ. बेडेकर विद्या मंदिर (मा. वि.) ठाणे.


●●●

# ये आकाशवाणी हैं ...


*आकाशवाणी आणि दूरदर्शन या दोन बाबींच्या अनुभवांचे आठवणींचे विषय मराठी मनाला नेहमी सुखावतात अशाच काही आठवणी आकाशवाणीच्या- संपादक*

पूर्वी घराघरात दिवसाची सुरुवात आकाशवाणीच्या मंगल प्रभातने व्हायची. बाकीचे घरदार साखर झोपेत असायचं, सात वाजले तरी. पण आई आजी पहाटेच उठून झाडलोट, सडासारवण करून चहाचा घोट घेत रेडिओ ऑन करायच्या, नि मंगल प्रभातच्या भक्ती संगीतानं घर चिंब न्हाऊन निघायचं. मग अंघोळी आटपून दोघी कामाला लागायच्या. आई स्वयंपाकाचं बघायची. आजीचे पूजापाठ चालू व्हायचे. आईचं पण स्तोत्र पुटपुटतच काम चालयचं, त्यावेळी टी. व्ही. नव्हताच. त्यामुळे घरात रेडिओच असायचा करमणुकीसाठी. आजही आठवतंय, आम्ही तेव्हा बालविहार, गंमत-जमंत असे कार्यक्रम बुधवारी बिनाका गीत माला, नि एरव्ही विविध भारती ऐकायचो. दादा नि बाबा आणि आजोबा सुद्धा क्रिकेट कॉमेंट्री रेडिओला कान लावून ऐकायचे. मग ट्रान्झीस्टरर्स आले. मग रेडिओ मोठ्याने लावला की मग इतरांना त्रास व्हायचा. त्यापेक्षा त्याच खोलीत एकीकडे दुसरे काम करत ऐकला तरी चालायचे. पण ट्रान्झीस्टरमुळे एक सोय झाली की, तो उचलून कुठेही नेता यायचा. अंगणात गच्चीवर कुठेही. मग ट्रान्झीस्टर कम टेपरेकॉर्डर आले. यात गाणी किंवा रेकॉर्ड केलेल्या कार्यक्रमाची टेप टाकून ऐकता येऊ लागले. त्यानंतर 'डेक' आले. मग सी. डी. प्लेअर आले.

आता तर टी. व्ही., सी. डी. चाच जमाना आहे. त्यामुळे रेडिओला विचारतो कोण? घरात टी. व्ही. हॉलमध्ये मोक्याच्या जागी ठाण मांडून बसलेला असतो. एकत्र कुटुंब म्हणजे आई वडिल मुलं नि आजी आजोबा. एवढी माणसं एकत्र रहात असली तर प्रत्येकाची कार्यक्रमाची आवड निवड वेगवेगळी. मग प्रत्येकाने यायचे नि आपला कार्यक्रम पाहून



जायचे. म्हणजे त्यातही ॲडजेस्टमेंट करावी लागायचीच. आजी आजोबांना एखादी मराठी सिरियल पहायची असेल तर त्याच वेळी आई वडील (सॉरी आजचे मम्मा नि पप्पा) नि मुलांना हिंदी कार्यक्रम पहायचा असायचा. मग रात्री त्यांनी सर्वांनी त्यांचे हिंदी कार्यक्रम पहायचे मग दुसऱ्या दिवशी आजी आजोबांनी दुपारी आपल्या मराठी मालिका सर्व ऑफिस, शाळा, कॉलेजला गेल्यावर पहायच्या. नाहीतरी प्रत्येक कार्यक्रम दुसऱ्या दिवशी रिपीट असतोच. दुसऱ्या दिवशीची कदाचित ही सोय टी. व्ही. वाल्यांनी म्हणूनच केली असेल. माझा भाऊ तर म्हणतो, एकाच तळ्यावर वेगवेगळे प्राणी वेगवेगळ्या वेळी पाणी प्यायला येतात नाही का? कुणी सकाळी, कुणी दुपारी, कुणी संध्याकाळी, कुणी पहाटे तसेच हे आजी आजोबा त्यांच्या वेळेस, पप्पा नि मम्मा त्यांच्या हिंदी सिरियलसच्या वेळी, मुले कार्टून बघायच्या वेळी. टी. व्ही. एकच तसे तळे एकच. फक्त प्राणी वेगवेगळे, वेळा वेगळ्या, वेगळ्या. माणसाचंही तसचं.



पण आजकाल कुटुंब एकत्र आहेतच कुठे! हम दो हमारे दो किंवा एकच. आता मी ही आजी झालेय. जमाना बदललाय, साधनं बदललीत. रॅट रेस मधे जग धावतंय. कारण थांबला तो संपला. काळाबरोबर सर्वांना जमवून घ्यावच लागतं. 'सरव्हायव्हल फॉर दी फिटेस्ट' पूर्वी पेक्षा स्पर्धा वाढलीय. त्यामुळे नव्या पिढीला त्याला तोंड द्यायला लागतंय. नवी पिढी या जीव घेण्या स्पर्धेत भरडली जातेय. चैन, सोयी सुविधा वाढल्यात. तशाच चिंता नि काळज्या, अशांती - असमाधान सुद्धा.

सध्या नवी पिढी 'ढॅण्डढॅण्ड' डेक नाहीतर टी.व्ही च्या काजोल फॅमिली बरोबर डॉन्स विथ फॅमिली 'नच बलिये', 'एकापेक्षा एक', 'धिनधिना धिन', 'धूम धमाका' यावर झोकात सतत नाचतेय. 'दम दमा दम' मध्ये मुली अर्थात् छोट्या अर्थही न कळणाऱ्या गाण्यांवर ('फाटला ग कोना माझ्या चोळीचा', 'आई मला नेसव शालू नवा', 'या रावजी बसा भावजी', 'ऐका दाजिबा' या सारख्या) नाचताहेत. आई वडिलांनाही त्यात धन्यता वाटेतय माझी चिमुरडी किती हुबेहुब त्या अमूक तमूक ॲक्ट्रेस सारखी नाचते म्हणून.

पण आम्ही मात्र, आमच्या खोलीत ट्रान्झीस्टर ठेवलाय! जुनं ते सोनं समजून. 'उठी उठी गोपाळा, 'उठी श्रीरामा', किंवा 'अरुण उगवला प्रभात झाली उठ महा गणपती' ही मंगल प्रभात अजूनही कानावर पडली की दिवसाची सुरुवात कशी छान होते. सारखा तो झगझगीत टी. व्ही. बघण्यापेक्षा शांत पणे डोळे मिटून रेडिओ ऐकण्यात वेगळंच सुख असतं. रात्री आम्ही दोघं शांतपणे दिवा मालवून बाल्कनीत खुर्च्या टाकून बसतो. जेवणं खाणं झाल्यावर एखादं नभोनाट्य ऐकत नाहीतर नाट्यसंगीत ऐकत. नव्या पिढीला टी. व्ही चं आकर्षण असू दे, पण आम्हांला तर आकाशवाणी अमृतवाणी वाटते. 'उठी उठी गोपाळा' म्हणून उठवणारी नि 'निजल्या तान्हावरी माऊली दृष्टी सारखी घरी' म्हणून थोपटून झोपवणारी...

**श्रीमती आशा भिडे**
बी/९ विजय अर्पाटमेंटस्,
आराधना टॉकीजजवळ,
ठाणे (प.) ४०० ६०२
दूरध्वनी - २५४१०१४०
मोबाईल - ९३२४०४४७६४

●●●

दि
शा
नियमित
वाचा.

आपली
मते
जाणून
घेण्यास
आम्ही
उत्सुक
आहोत.

# संत गोरोबा कुंभार

*संतांचे जीवन व कर्तृत्व यांचा परिचय करून देणारी शंकरराव मठांचा ही लेखमालिका दिशातून येते. त्यातील हा एक लेख - संपादक*

तेरढोकी नावाचे एक छोटेसे गांव पंढरपूरपासून २५/३० कोसावर आहे. तिथे एक हरिभक्त राहात होता. आपल्या भक्तीने त्याने ते सुगंधित केले होते. पंढरी म्हणजे भू वैकुंठ. वैकुंठीचा राणा पृथ्वीवर राज्य करण्याच्या मिषाने पंढरीत अवतीर्ण झाला. हा अयोध्येत होता. हाती धनुष्यबाण घेऊन उभा राहिला. वृंदावनात त्याच्या बासरीच्या नादाने गौळणी नृत्य करत. यानेच मथुरेत दहा दुधांचे हंडे पालथे घातले. दक्षिणेत तिरूपती म्हणून उभा ठाकला. अशा प्रकारे अनंत रूपात व अनंत वेषात तो वावरतो. देव भावाचा भुकेला हे रहस्य सर्वत्र भक्तांनी ओळखले. अनंत सुरात भक्त मंडळींनी त्याला आळवले. आणि आपल्या जीवनाचे सार्थक केले तसेच तेथील भूमीही सुगंधित केली.

गोरोबा जातीने कुंभार. त्यांनी पायांनी जन्मभर चिखल तुडवला. पण नीती तुडवली नाही. उलट जोपासली. गाडग्या मडक्याना आकार देताना नाठाळ मनालाही वळण लावले. गावच्या वेशी पाशी जवळच तेरढोकीचा कुंभार राहात होता. त्याच्या घरावर सोनेरी किरणे उधळीत नित्याप्रमाणे त्या दिवशीही सूर्यनारायण उगवला. घराघरातून जात्याची घरघर थांबली. तांबट आळीतून ठणठणाट सुरू झाला. कुंभार वाड्यातील कुत्री नवख्या माणसावर भुंकू लागली. थोडक्यात तेरढोके गावही जागे होऊन हालचाल करू लागले.

गोरोबा सकाळचे स्नान आटोपून पुन: चिखलात काम करू लागला. घराच्या शेजारी कडुलिंबाच्या सावलीला बैल बांधला होता. कडुलिंबाचे झाड हिरव्यागार पानाने बहरले होते. पिवळ्या धमक निंबोण्यांचा भोवताली सडा पडला होता. कितीतरी वेळ गोरोबा झाडाकडे कौतुकाने पाहात होता. आज सकाळ पासूनच तो धुंद होता. भक्तीचा कोंब फुटला होता.

**धुंद झालेला भक्त :**

विचारात शब्द सुचत होते. चाक गरगरा फिरू लागले तसा शब्दानाही वेग आला.

मुकिया साखर चाखाया दिधली। बोलताही बोली बोलवेना।
तो काय शब्द खुंटला संवाद। आपला आनंद अवधाराया।
आनंदी आनंद मिळोनी राहाणे। अखंडित होणे न होनिया।
गोरा कुंभार म्हणे जीवन मुक्त होते। जग हे करणे शहाणे बापा।

अशा धुंद अवस्थेत संती - त्याची बायको- त्याच्यावर मूल सोपवून पाण्याला केव्हा गेली, ते त्याला कळलेही नाही. मनाला रंग चढला होता. शब्दांना धुंदी आली होती. भक्ती उफाळून वाहात होती. त्याला जगाचे भानच नव्हते. जगात नित्यच आश्चर्ये घडत असतात, पण आजचे आश्चर्य काही आगळ्या स्वरूपाचे होते.

गोरोबाचे बाळ रांगत रांगत चिखलात आले. व चिखलात रुतले. ढोपरापर्यंत बंडी घातलेला गोरोबा ओल्या चिखलात नाचत होता. चिखलाने बरबटलेल्या हातानेच चिपळ्या वाजवीत होता. हाताने काम मुखाने नाम आणि लक्ष पंढरीरायाकडे. या पलीकडे काही नाही. मुखातून अभंग स्त्रवू लागले -

केशवाचे भेटी लागलेले पिसे। विसरलो कैसे देहभावा।

तो देववेडा नाचत होता. स्वत:चे मूल पायाखाली तुडविले जात होते. चिखलात एक जीव होत होते. आकाशात वर आलेला सूर्य हा प्रकार पहात होता. काळा चिखल लाल होत होता. मांस आणि माती एक जीव होत होती. अभंगाची दुसरी ओळ जन्म घेत होती.

''जाळी झडपणी, जाळी झडपणी। संचारले मनी आदिरूप।''

इतक्यात धुण्याचे पिळे खांद्यावर टाकून डोक्यावर पाण्याचा हंडा घेऊन मागच्या दारातून संती आत आली. तेव्हा सूर्य बराच वर आला होता. तिचे बाळ दुपट्ट्यावर नव्हते. पोर कुठे गेले उतावीळपणे तिने घरभर शोधले. घरधनीला खूप खूप हाका मारल्या. गोरोबाला याची दादही नव्हती. संती पुढ्यात येऊन उभी राहिली. तेव्हा अभंगाची तिसरी ओळ आकार घेत होती.

''न लिंपेची कर्मी न लिंपेची धर्मी। न लिंपे षडुर्मी पुण्यपापा।''

संतीने गोरोबाच्या हातातल्या चिपळ्या घेतल्या तेव्हा तो शुद्धीवर आला. खडसावून तिने विचारले - बाळ कुठे आहे?

गोराबा - मला ठाव नाही.

संती - म्हणजे?

गोरोबा- घरात असंल.

संती - घरात नाही.

गोरोबा - मला विचारू नगस.

अभंगाची चौथी ओळ बाहेर पडली -

''म्हणे गोर कुंभार। सहजी जीवन्मुक्त।''

आता संतीचे लक्ष खाली गेले. बाळाच्या रक्त मांसात चिखल लाल झाला होता. बाळ जीवन्मुक्त झाला होता. प्राण कंठात आणून ती ओरडली. काय चालविले तुम्ही हे? माझ्या बाळाला ---

गोरोबा भानावर आला. आता पर्यंत तो केवळ देहानेच तेथे होता. आता मनावरील कैफ उतरताच तो मनानेही तेथे आला. मग त्याच्या डोळ्याला संती दिसली. बाळाकरिता आक्रोश करणारी तिच्यातील आई दिसली. बाळाच्या रक्ताने लाल झालेला आपल्या पायाखालचा चिखलही दिसला. हे सारे घडत होते तेव्हा मध्यान्हीचा सूर्य जणू हे सारे पाहात होता. गोरोबाने आपल्या लहानग्या बाळाचा खून केला होता. आपलं तोंड बाहेर काढणेही त्याला मुष्कील झाले. रोज संती पाण्याला निघाली की, त्याच्या कानी शब्द येत. संतीचा नवरा भ्रमिष्ट झाला आहे.

**घरातील वातावरण :**

संतीने खूप सहन केले. बाळाच्या मृत्यूचे दु:ख विसरून अत्यंत हळुवारपणे ती गोरोबाचे सांभाळ करू लागली. गोरोबा उदास होता. चाकावर मडक्यांना आकार देताना वाटायचे देवाने माझ्या प्रारब्धाला असा आकार का बरे दिला. पोटचे पोर गेले आणि बायकोला जवळ करावे तर तिने शपथ घातली. मला हात लावाल तर तुम्हाला विठोबाची आण आहे. नंतर संतीने खूप विनवणी केली पण गोरोबाने स्पष्ट सांगितले - एक वेळ सूर्य पश्चिमेकडे उगवेल, तृण आपल्या पोटी विस्तवाला जागा देईल पण विठोबाची आण मोडून मी तुझ्या शरीराला स्पर्श करणार नाही.

संती गप्प तडफडत राहिली. तिला वाटू लागले गोराचा वंश विस्तार खुंटता कामा नये. एक दिवस गोरोबाला सांगून ती माहेरी गेली. घरी मुलगी आलेली पाहून आई वडिलांना आनंद झाला. ती आपल्या वडिलाना म्हणाली - बाबा गोरोबाचे दुसरे लग्न लावून द्या. त्याचा वंश खुंटता कामा नये. आपल्या रामीचे त्याच्याशी लग्न लावा. आम्ही बहिणी सवती म्हणूनही न भांडता सुखाने राहू. आपण निश्चिंत असा.

---

सर्व गोष्टी आपल्या मनाप्रमाणे घडाव्यात, हा आग्रह दु:खाला कारणीभूत ठरतो.

संती गोरोबाच्या वंश विस्तारासाठी आपल्या बहिणीलाच सवत म्हणून स्वीकारण्यास तयार झाली. मधेच तिच्या मनात आले आता हिचेही मूल मातीत जाणार, वेड्या कुंभाराचे दुसरे मूलही मातीत जाणार. पण तसे घडले नाही संती सारखीच रामीही निपुत्रिक राहिली.

संतीच्या शपथेमुळे तिला गोरोबाने स्पर्श केला नव्हता. रामीच्या बाबतीत देखील शब्दाने घात केला. संतीचा पिता म्हणाला, दोनही कन्यकांचा सांभाळ करा. तुम्हांला विठोबाची आण आहे. गोरोबाने रामीलाही स्पर्श केला नाही.

एकदा रात्री झोपला असताना दोनही बायका गोरोबाच्या बाजूला निजल्या. झोपेत त्याचा हात त्यांच्या अंगावर पडला. गोरोबाला अतिशय वाईट वाटले. ज्या हातांनी हे कर्म केले त्याना शिक्षा म्हणून दोनही हात धारदार शस्त्रावर आपटून त्याने तोडून टाकले. हे कृत्य पाहून तेरढोकी गांव थरारले. त्या लोकांची खात्री पटली गोरोबा भ्रमिष्ट नाही, निष्ठावंत आहे. त्याच्या विश्वासासाठी गोरोबांना दोनही हात गमवावे लागले. संती, रामी रडू लागल्या. गोरोबाने त्यांची समजूत काढली. तेही दिवस गेले.

**विठ्ठल भक्तीत रंगले गोरोबा :**

गोराबा थोटा होऊन अभंग रचू लागला.

'देवा तुझा मी कुंभार। नाशी पापाचे डोंगर।
ऐशा संतापे हे जाती। घडे साधूची संगती।
पूर्ण कृपा भगवंताची। कुंभार गोरा मागे हे चि।

ज्येष्ठ पौर्णिमा ओसरली. वाऱ्याच्या झुळकांडीने कडुनिंबाच्या फांद्या हलू लागल्या. सुकी पाने गळून पडली. अंगणात पिकल्या निंबोणीचा सडा पडला. अंगणातून मुंग्यांच्या रांगा लागल्या. आषाढ लागला. पावसाच्या सरीने मृदगंध दरवळू लागला. आषाढी एकादशीला गोरोबा आपल्या दोन्ही बायकांसह पंढरपूरला दिंडीबरोबर निघाला.



वैष्णव जन नाचत बागडत होते. भगव्या पताका फडकावीत होते. मृदंग विठ्ठलाचा गजर करू लागले. वाटचालीत अंतर केव्हा संपले कळले नाही. गोरोबा गर्दीबरोबर पंढरीत आला. चंद्रभागेत स्नान केले. पुंडलिकाचे दर्शन घेऊन दोन्ही स्त्रियांसह राऊळात आला.

**मंदिरात :**

त्यावेळी देवळात नामदेव काकडा ओवाळीत होता. असंख्य मंडळी मुखाने म्हणत होती -

उठा पांडुरंगा आता दर्शन द्या सकळा।
झाला अरुणोदय सरली निद्रेचा वेळा।
संत साधु मुनि अवघे झालेती गोळा।
सोडा सेज सुख आता पाहू द्या मुख कमळा।
रंग मंडपी महाद्वारी झालीसे दृष्टी।
झाले मुक्तदार लाभा झाला रोकडा।
विष्णुदास नामा उभा घेऊनी काकडा।

काकड्याचा उजेड विठ्ठलाच्या गाळावर पडला होता. गळ्यात तुळशीहार, कासेला पितांबर, थंडी निवारण्यासाठी

गळ्याभोवती शाल अशा वेशात पंढरीचा राणा विटेवर उभा राहून सर्वांना दर्शन देत होता. सहस्त्र नेत्र ते रूप आकंठ पीत होते. शेवटी एकच गजर सुरू झाला. विठ्ठल विठ्ठल जय हरि विठ्ठल ---

**भाव विभोर गोरोबा :**

पखवाज घुमू लागले, टाळ वाजू लागले, वीणा निनादु लागल्या, पाय नाचू लागले, हात टाळ्या वाजवू लागले. भाव विवशतेने हे सारे गोरोबा पाहात होता. तोंडाने विठ्ठल विठ्ठल म्हणत होता. डोळ्यांतून अश्रू वाहात होते. मनात कळ आली. विठ्ठल म्हणताना टाळ्यांचा ठेका पाहिजे, पण हात थोटे झालेले. मात्र मनात येताच हात हलू लागले. थोट्या हाताला पंजे आले. झाडाला अकस्मात पालवी फुटली. हृदयातील भक्ती उफाळून वर आली. साऱ्या तेरढोकीचे वारकरी गोरोबा भोवती फेर धरून नाचत होते. तो नाच पाहताना विठ्ठल देखील गहिवरला. भजन थांबले.

कुंची घातलेले बाळ घेऊन संती गोरोबाच्या पुढ्यात उभी राहिली. थोट्या हाताला पालवी फुटली. प्रभु कृपा झाल्यावर संतीला तिचा बाळ परत मिळाला. तेरढोकीच्या लोकाना गोरोबाने आपला परिचय याप्रमाणे करून दिला. गोरोबा सर्व संत मंडळीत वडिलधारी होते. ज्ञानदेव त्यांना प्रेमाने गोरोबाकाका म्हणायचे. त्यामुळे सारेच त्याना काका म्हणू लागले.

**गोरोबांच्या भेटीस संत मंडळी :**

गोराबा थोराड, उंचेपुरे पण वय झाल्यामुळे आता थकले होते. त्यांना भेटण्यासाठी पंढरीहून मंडळी आली. त्यात ज्ञानदेव, नामदेव, सोपान, बंका, बाका, मुक्ताई इत्यादी मंडळी होती. शिवाय मंगळवेढ्याहून चोखोबा, अरणहून सावतामाळी आले होते. त्यांच्या घरासमोर मडक्यांचा ढीग पडलेला होता. त्याकडे पाहून ज्ञानोबा म्हणाले - गोरोबा तुम्ही कुंभार - कच्ची व पक्की मडकी नीटपणे आपल्याला कळत असतील नाही का? 'हो, की' परकर सावरीत छोटी मुक्ता म्हणाली.

मुक्ता पुढे म्हणाली, 'गोरोबाकाका आज संत मंडळी जमली आहेत. तर कुणाचे मडके कच्चे आहे ते पारखून ठरवा.' ठीक आहे म्हणून गोरोबा उठले. प्रत्येक संताच्या डोक्यावर थापटी मारून ते त्याची परीक्षा पाहू लागले.

प्रथम थापटले निवृत्तीचे डोक्या। डेरा जाहला निका परब्रह्म।

तेचि थापटणे ज्ञानदेवावर। आता कैसे कोरे तुरे तेथे।

तेचि थापटणे मुक्ताईसी हाणी। अमृत संजीवनी भरलासे।

तेचि थापटणे नामदेवावर। चोलीत समोर रडू लागे।

थापटीचा आघात नामदेवाखेरीज सर्व संतानी सहन केला. नामदेव चिडले व रागाने म्हणाले - ही काय आदरसत्काराची रीत झाली गोरोबांची? गोरोबा त्यावर म्हणाले - हेच मडके कच्चे आहे ज्ञानदेवा !

सर्व संत हसू लागले. नामदेवांनी ही गोष्ट विठ्ठलाला सांगितली तेव्हा विठ्ठलाने त्यातील मर्म त्याला सांगितले आणि गुरु उपदेश घेण्याचा सल्ला दिला. अशी गोरोबाची योग्यता होती. तेरढोकीला गोरोबांची समाधी व तसेच त्यांनी बांधलेले देऊळही दिसते. (गोरोबांचा काळ ख्रिस्ताब्द १२६७ ते १३१७)

**श्री. शं. बा. मठ**
६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
वंदना बस स्थानकाजवळ,
ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : २५३५२०३०

●●●

*एक विचार :*
*पाणी अमूल्य आहे; जपून वापरा.*

# एका वादळी व्यक्तिमत्त्वाची ओळख

*२०१० साली, १२ एप्रिल रोजी पु. भा. भावे यांच्या जन्म शताब्दीची सांगता होईल. पुढील ऑगस्टमध्ये १३ ऑगस्टला त्यांची पुण्यतिथी आहे. त्या निमित्ताने हा लेख- संपादक*

कडवे हिंदुत्वनिष्ठ, स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे विलक्षण अभिमानी आणि एक प्रतिभासंपन्न लेखक या तीन गुणांमध्ये पु. भा. भावे या व्यक्तिमत्त्वाचे सारे पैलू सामावलेले आहेत.

उत्कृष्ट वक्ते, अष्टपैलू व्यक्तिमत्वाचे कादंबरीकार, कथा, कादंबरी, प्रवासवर्णन, नाटक, ललित गद्य, व्यक्तिचित्रे, चिंतनात्मक लेख, चित्रपटकथा इत्यादि साहित्य प्रकार त्यांनी उत्तम प्रकारे हाताळले. वयाच्या पंधराव्या वर्षी कथा लिहून त्यांनी लेखन व्यवसायात पदार्पण केले.

बालपण विदर्भात व काही काळ नागपूरात वास्तव्य. त्यात स्वत:ची प्रखर बुद्धी व मेहनत करण्याची तयारी यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व चौफेर पसरले. वाचनाच्या दांडग्या उत्साहामुळे त्यांना साहित्याच्या दालनात प्रवेश मिळाला तो कायमचा.

जन्म नागपूरचा असलेल्या भाव्यांचे संगोपन आजोबांनी केले. वडील डॉक्टर होते. भावे हे नागपूरच्या हिस्लॉप व लॉ कॉलेजचे विद्यार्थी होते. कायद्याची चिकित्सक बुद्धी व कट्टर हिंदुत्वनिष्ठा यामुळे ते सनातन भारतीय संस्कृतीचे व जीवनमूल्यांचे उपासक होते.

सर्वप्रथम त्यांची 'फुकट' ही कथा १९३१ मध्ये प्रकाशित झाली. नंतर त्यांनी वृत्तपत्रातून लेख लिहिले. वाचकांना त्यांच्या प्रतिभेचे हे प्रथम दर्शन. भाषासौंदर्य आणि परखड विचार हे त्यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य होते. त्यांचे 'आदेश' नावाचे साप्ताहिक होते. त्यातून त्यांनी अनेक लेख लिहिले व आपले विचार वाचकांपुढे मांडले. लेख संग्रहातून त्यांनी आपली मते अतिशय प्रामाणिकपणे मांडली.

जीवनातील दिव्य आणि सौंदर्य यांवर त्यांची श्रद्धा होती. जीवनातील ढोंगीपणाचा त्यांना तिटकारा होता व ढोंगीपणा व दांभिकपणावर त्यांनी कडाडून हल्ला चढवला. जातीभेदामुळे ऐक्याला बाधा येते असे ते मानीत असत.

मराठी नवकथेची, सुरुवात त्यांनी केली असे मानले जाते. 'सावल्या', 'प्रतारणा', 'नौका', 'घायाळ','पहिले पाप', 'संगम', 'फुलवा' आदी एकाहून एक सरस कथा त्यांनी लिहिल्या. त्यांचे एकूण २७ कथासंग्रह प्रकाशित झालेले आहेत. त्यांनी साहित्यक्षेत्रात अढळ स्थान प्राप्त केले आहे.

१७ कादंबऱ्या, २७ कथासंग्रह, ८ नाटके, १२ लेखसंग्रह, २ पटकथा, 'सावधान' व 'आदेश' ही वृत्तपत्रे तसेच 'प्रथम पुरुषी एकवचनी' हे आत्मवृत्त. इतक्या प्रचंड साहित्य संपदेची निर्मिती त्यांनी केली.

झुंजार आणि आक्रमक शैलीच्या पत्रकारांत त्यांची गणना होतेच, पण कथाकार म्हणून भावे गाजले. संवेदनक्षम, भावनाप्रधान, उत्कट स्वभावाची पात्रे त्यांच्या कथांत दिसतात. स्वातंत्र्य प्राप्तीच्या दरम्यान निर्माण झालेला हिंदु मुसलमानांतील संघर्ष, स्त्री पुरुषांमधील प्रेमाचे स्वरूप, बदलत्या संस्कृतीचे समाजावर होणारे आघात हे त्यांच्या कथाविश्वातले विषय आहेत. काव्यात्मता, कल्पनारम्यता आणि भावोत्कट, नाट्यमय, आवाहक शैली हे भाव्यांच्या लेखनाचे विशेष होत. जुन्या कथाशैलीतील बोधपरता, कथानक, घटना या भोवती कथा न फिरता मनातील भावावेग

टिपणारी शैलीदार कथा भाव्यांनी लिहिली व ती लोकांना भावली.

भाव्यांनी दर्जेदार नाटके हि लिहिली. विषकन्या (१९४४), स्वामिनी (१९५६), पडछाया (१९६०), महाराणी पद्मिनी (१९७१) इ. नाटके गाजली.

त्यांची पहिली कादंबरी 'अकुलिना' (१९५०) पुढे, 'अंतराळ', 'वर्षाव', 'आग', 'रोहिणी, 'चोरांचा बाजार', 'अडीच अक्षरे', 'जादूचे पाणी', 'व्याध', 'दोन भिंती' इ. कादंबऱ्या लिहिल्या. स्त्री पुरुषांमधील आकर्षण, त्यातून निर्माण होणाऱ्या अपेक्षा आणि व्यथा, वार्धक्य, एकटेपणा मृत्यू हे प्रमुख विषय त्यांच्या कादंबऱ्यात दिसून येतात.

भाव्यांचे निबंध लेखन हिंदुत्ववादी मते हिरीरीने मांडणारे आहे. भाषेला प्रचारी आवेग आहे. त्यांचे विनोदी लेखसंग्रह 'वाकुल्या' व 'वायबार' हे प्रसिद्ध आहेत. तर 'वाघनखे', 'लवंग वेलदोडे', 'आनंद सोपान', 'पणत्या', 'स्मरणी', 'रांगोळी' हे स्फुटलेख संग्रह आहेत.

हिंदुत्ववादी पत्रकार म्हणून त्यांनी कट्टर हिंदुत्ववादी लेख लिहिले. 'सहदेवा अग्नि आण' यासारखे धगधगते राजकीय लेख त्यांच्या 'रक्त आणि अश्रू' या लेखसंग्रहात समाविष्ट आहेत.

लेखक, पत्रकार, कादंबरीकार, साहित्यिक, नाटककार अशी सार्वजनिक प्रतिभा असणारे भावे. खाजगी जीवनात 'दिलदार आणि कुर्रेबाज व्यक्ती होती' असे त्यांचे एक जवळचे मित्र अरविंद ताटके यांनी लिहिले आहे. ते वृत्तीने अतिशय रसिक होते. कपड्यांचा, चित्रपटांचा त्यांना शौक होता. सुवासिक अत्तरांचा त्यांच्याकडे मोठा संग्रह होता. आलेले पाहुणे मित्र यांना या अत्तराचा सुवासाचा लाभ व्हायचा. सैगलचे गाणे त्यांना आवडे. त्याचा 'देवदास' हा चित्रपट त्यांनी किमान २५ वेळा तरी पाहिला होता. बाबुराव पेंढरकर हे त्यांचे निकटवर्ती मित्र होते.

भाव्यांनी नोकरी केलीच नाही. 'आदेश' बंद झाल्यावर ते लेखनावर व व्याख्यानांवरच जगले. सत्काराचेही भावे मूल्य घेत असत. ते म्हणत 'माझा चरितार्थ लेखणीवर व वाणीवर चालतो. सत्कारानंतर मला बोलावं लागतंच, त्याचं मूल्य मी घेतो.'

भाव्यांच्या काही श्रद्धा होत्या. निष्ठा होत्या त्यांना कोणी तडे देण्याचा प्रयत्न केला तर ते अत्यंत परखडपणे उत्तरे देत. त्यामुळे त्यांच्याबद्दल अकारण गैरसमज पसरत. अत्रे - आदेश खटल्यात अत्र्यांनी खटला मागे घेतला तरी भाव्यांच्या मनात अत्र्यांविषयी वैयक्तिक वैर अगर द्वेष नव्हता.

या खटल्यासंबंधी ते म्हणत 'मी अत्र्यांना शत्रू कधीच मानलं नाही. त्यांचं माझं वैयक्तिक वैर काही नव्हतं. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्यावर त्यांनी वाईट लिखाण केले म्हणून मी त्यांच्यावर खवळून उठलो आणि त्यातून अत्रे-आदेश खटला निघाला. त्यानंतरही त्यांनी अत्र्यांचे तोंड भरून कौतुकच केले. त्यांच्या गुणांचे पूजन केले.

ताटके लिहितात की 'भावे कुबेर नसले तरी सुखवस्तू होते. मनाचं सौदर्य त्यांच्या ठायी जसे होते तसेच मित्रांवर अलोट प्रेम करण्याची शक्तीही त्यांच्यापाशी होती. भावे लोकांना कसेही वाटोत मला ते मायाळू मित्रच वाटत राहिले.'

अशा या कडव्या हिंदुत्ववाद्याची स्वा. सावरकर भक्ताची प्रतिभाशाली लेखकाची आणि अनेकांचा मायाळू मित्र असणाऱ्या पु.भा. भाव्यांची जन्मशताब्दीनिमित्त ही थोडक्यात ओळख.

संदर्भ : १) मराठी विश्वचरित्र कोशखंड ३
२) मराठी वाङ्मयकोश १९२० ते २००३
३) मुंबई तरुणभारत १०-८-९७ 'ऐसी अक्षरे' अरविंद ताटके लेख. 'माझे मायाळू मित्र पु. भा. भावे.'

**१९७७ साली अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष पदावरून कै. भावे यांनी व्यक्त केलेले महत्त्वाचे विचार :**

पु. भा. हे साहित्यिक तर होतेच शिवाय त्यांच्या वाणीला आणि लेखणीला प्रखर धार होती. तिच्यामुळे ते फर्डे वक्ते आणि मर्मस्पर्शी लेखक म्हणून प्रसिद्ध होते. नोव्हेंबर १९७७ साली पुणे येथे झालेल्या ५२ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष म्हणून निवडून आले होते. त्यांच्या भाषणातील काही मुद्दे पुढे चौकटीत दिले आहेत.

**लेखकाचे स्वातंत्र्य :**

''लेखकाचे किंवा अन्य कोणाचेही स्वातंत्र्य अमर्याद नसते. एकाच्या स्वातंत्र्यावर दुसऱ्याच्या स्वातंत्र्याच्या मर्यादा पडत असतात. एकाच्या अधिकारावर दुसऱ्याच्या अधिकारांची बंधने पडत असतात. मोठा प्रतिभावंत लेखक असला तरी, त्याला समाजाचे काही नियम पाळावेच लागतात. भारतीय दंडविधानापासून अगदी मोठ्यातला मोठा लेखक मुक्त नाही.

**वास्तववाद ! :**

कलेला सुद्धा तिचे नियम आहेत. तिची पथ्ये आहेत, बंधने आहेत, मर्यादा आहेत, वास्तववादाचे नाव सांगून लेखकाला हवे तसे लिहिता येणार नाही. त्या लिहिण्याला कुणी कलात्मक लिहिणे म्हणणार नाही. कला ही पूर्णपणे वास्तव कधीच नसते. वास्तव वाटणारे अवास्तव, खरे वाटणारे खोटे, अकृत्रिम वाटणारे कृत्रिम हेच कलेचे स्वरूप आहे. चित्रकार, गायक, लेखक सारखी निवड करीत असतात. रंगांची निवड, भावनांची निवड! आणि निवड म्हटली म्हणजे वास्तवता संपली आणि अतिवास्तवता तर अगदी पूर्णपणे संपली.

कोणत्याही ललितकृतीची उंची त्या ललितकृतीतील भावनेच्या, कल्पनेच्या, व्यक्तिरेखांच्या उंचीइतकी असते. मोठी कलाकृती मोठा आशय मागत असते. मोठ्या आशयाचा मोठ्या नैतिकतेशी व मोठ्या चारित्र्याशी संबंध असतो.

**कलेचे महत्त्व :**

उत्तम कलाकृतीत आशय व कला ह्यांचा संगम व्हावा लागतो. आशयाविना कला दुबळी आहे व कलेविना आशय पांगळा आहे. भारतीय दंडविधानात आशय पुष्कळ आहे. पण ती कलाकृती नव्हे.

**भाषेविषयी मागणे :**

माझे मागणे शुद्ध भाषेविषयी आहे. ब्रिटिश राज्यात झाली नसेल, अशी मराठीची उपेक्षा व विटंबना आज चालू आहे. देव भाषा संस्कृतकडे आम्ही पाठ फिरवत आहोत. शुद्धाशुद्धतेचा आम्हाला विसर पडला आहे. इंग्रजी शब्दांनी आमची भाषा आम्ही जागोजाग डागाळतो आहो. ही स्थिती भयंकर आहे. तिच्यावर त्वरित उपाय झाला पाहिजे.

**श्री. विश्वनाथ शेंड्ये**
द्वारा, प्राच्य विद्या अभ्यास संस्था,
शाहू मार्केट, महात्मा गांधी रोड,
ठाणे (प) - ४००६०२
दूरध्वनी : २५३८८३५८

●●●

पुस्तक परिचय

# प्रकाशाची वाट

**''मुख्य ते हरिकथा निरुपण। दुसरे ते राजकारण।**

**तिसरे सावधपण। सर्वविषयी॥**

मानवी जीवनात परमेश्वर भक्तीनंतर ''राजकारणाला'' समर्थांनी दुसऱ्या क्रमांकाचे स्थान दिलं आहे. जीवनाचा तो एक अविभाज्य घटक आहे. अर्थात यामध्ये समाजकारण, अर्थकारण, व्यवहार कौशल्य, परस्परांमधील संबंध इत्यादी सर्व गोष्टी समावेषक आहेत. संसारात हे सर्व करणं आवश्यक आहे. मात्र हे सर्व नेकीनं, जनहित लक्षात घेऊन, सचोटीनं करावं, हे समर्थांना अभिप्रेत आहे. परंतु विद्यामान परिस्थितीत राजकारण म्हणलं तर सुशिक्षित, सुसंस्कारित समाजवर्ग त्यापासून चार हात दूर राहण्याचा प्रयत्न करीत असल्याचं लक्षात येतं. किंबहुना राजकारणाविषयी त्यांच्या मनात औदासीन्य, तिरस्कार, घृणेची भावना आहे. Politics is a dirty game असं म्हटलं जातं आणि याचं कारणं म्हणजे यामध्ये वावरणारी राजकारणी मंडळी. अर्थात यातही काही अपवादात्मक व्यक्ती जरूर आहेत.

''प्रकाशाची वाट'' या पुस्तकाचे लेखक श्री. अप्पा परचुरे पेशाने प्रकाशक आहेत. नामवंतानी लिहिलेलं साहित्य वाचकांपर्यंत पोहोचविण्याचा त्यांचा पिढिजात व्यवसाय. परंतु अप्पांनी अत्यंत साध्या, सरळ आणि सोप्या भाषेत श्री. सुशीलकुमार शिंदे यांच्या सारख्या चतुरस्त्र कार्यकतृत्वाविषयी, त्यांच्या जीवनचरित्र्याविषयी लिहिण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. तीस वर्षांहून अधिक त्यांचा सुशीलकुमारांशी संबध आहे. आणि म्हणूनच त्या अधिकाराच्या नात्यानं नवयुवकांना नजरेसमोर ठेवून श्री. अप्पा परचुरे यांनी हे लिखाण केले आहे. ''प्रकाशाची वाट'' श्री. सुशीलकुमार शिंदे यांची ही चरित्र कहाणी आहे. मे २००८ मध्ये या पुस्तकाची पहिली आवृत्ती परचुरे प्रकाशन मंदिर या संस्थेतर्फे प्रकाशित झाली आहे. अनेकांनी या पुस्तकाचं परीक्षण कदाचित वाचलेही असेल. परंतु दिशाच्या वाचकांना या पुस्तकाविषयी माहिती व्हावी, या जाणिवेतून हा परीक्षणात्मक लेख लिहिला आहे.

पुस्तक वाचताना त्याचं कुतहूल वाढत गेलं, त्याची ओढ आणि गोडी वाढत गेली. अल्पावधीत वाचून पुस्तक पूर्ण केलं. अप्पा म्हणतात, मी काही मोठा लेखक अगर साहित्यिक नाही, ही त्यांची विनम्रता आहे. पुस्तक वाचनीय तर आहेच परंतु देखणे आणि संस्मरणीय झाले आहे.

लॅमिनेट केलेल्या मुखपृष्ठावर सुशील कुमारजींच्या प्रगतीची वाटचाल दाखविली आहे, तर मलपृष्ठावर कविवर्य सुरेश भटांची कविता आणि ८० व्या मराठी साहित्य संमेलनाचे वेळी साहित्य रसिकांना अध्यक्षीय भाषणांतून संबोधतानचा फोटो सुशीलकुमारांविषयी बरंच काही सांगून जातं. हे सर्व विविधरंगी छायाचित्रांतून दाखविले आहे. पुस्तकांची सर्व पाने जाड फाईन आर्टपेपर वर छापली आहेत. विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि उत्तुंग व्यक्तिमत्त्वांसमवेत असलेली त्यांची रंगीत, कृष्णधवल छायाचित्रे व त्या खालचा मजकूर पुस्तकाचं ''डायमेन्शन'', सघनता वाढविण्यास उपयुक्त ठरतात.

प्रस्तावनेत लेखकांनी म्हटल्याप्रमाणे सुशीलकुमारांनी राजकारणात घेतलेली 'गरुडझेप' ही विस्मयजनक तर आहेच परंतु ती अभ्यासपूर्ण, प्रेरणादायक, बोधप्रद आणि विशेषत: तरुणांना दीपस्तंभासारखी आहे. चार दशकांहून अधिक काळ असलेला हा प्रवास खडतर होता परंतु ते डगमगले नाहीत. धैर्यानं त्याचा सामना केला. जीवनाचा हा प्रवास व संघर्ष सुरू असताना मातीला, तळागाळातल्या

गरीब जनतेला, कुटुंबीयांना आणि सहकाऱ्यांना ते विसरले नाहीत. माणूस केवळ पैशानं श्रीमंत असून चालत नाही तर मनाचाही मोठेपणा, श्रीमंती त्याच्याकडे असावी लागते. तरच तो लोकप्रिय ''लोकनेता'' होऊ शकतो. अत्यंत प्रतिकूल परिस्थिती अपमान, अवहेलना हे सारं विसरून वर्तमान काळातल्या जीवनाचा आस्वाद आणि आनंद घेत, उज्ज्वल भविष्याचा वेध घेणारा हा राजस आणि लोभस - ''लोकनेता'' आहे. गर्दीत रमणारा हा नेता आहे. त्यांच्याभोवती माणसांची सतत वर्दळ असते. सर्वांशी ते आत्मीयतेने, जिव्हाळ्याने आणि प्रेमाने बोलतात. विरोधकांनी त्यांना जरूर त्रास दिला असला तरी अत्यंत संयमानं, निग्रहानं आणि अभ्यासू व खिलाडूवृत्तीनं त्यांनी विरोधकांचे डाव उलटवून लावले आहेत.

लेखक म्हणतो, कम्युनिस्ट पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या श्रीमती अहिल्या रांगणेकर यांनी सुशीलकुमारांविषयी काढलेले उद्गार अतिशय बोलके आहेत. ''माझ्या मतदार संघातील गिरणी कामगारांनी शिवाजी महाराजांचा एक पुतळा उभारला आहे. स्वच्छ आणि कर्तबगार अशा मंत्र्याच्या हातून त्याचं अनावरण व्हावं म्हणून आम्ही तुमच्याकडे आलो आहोत. आपण पुतळ्याचं अनावरण करावं अशी आमची विनंती आहे.'' रणरागिणी म्हणून प्रसिद्ध असलेल्या विरोधी पक्षाच्या एका ज्येष्ठ महिलेने काढलेले उद्गार त्यांच्या विषयी बरंच काही सागूंन जातात.

सुशीलकुमारांनी शून्यातून आपलं स्वत:चं जग निर्माण केलं. ते केवळ दलित समाजाचे नेते होते, म्हणून त्यांना हे सर्व मोठेपणा मिळालं अस म्हणणं धाडसाचं ठरेलं. जे मिळालं त्यावर आत्मसंतुष्ट न राहतां आपल्या समाजाच्या विकासासाठी काहीतरी करावं असं त्यांना प्रकर्षानं वाटतं. राजकारणात असून देखील साहित्य, संगीत, क्रीडा, नाटक आणि सांस्कृतिक अशासारख्या कलांची मनस्वी आवड त्यांना आहे. साहित्यावरील प्रेम, त्यावरील असलेली श्रद्धा, विविध साहित्यविषयक कार्यक्रमांतील त्यांची उपस्थिती, अभिरुची, एखादी आवडलेली कविता आणि त्या कवीला मिळणारी दाद हे सर्व त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचं मनोहारी दर्शन घडविते. असं म्हणतात की यशवंतराव चव्हाणांनंतर साहित्यवर्तुळात रमणारा हा एकमेव ''लोकनेता'' आहे. काँग्रेस पक्षात असून देखील स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या जन्मशताब्दीला उपस्थित राहणारा, सर संघचालक बाळासाहेब देवरस यांच्याशेजारी बसणारा, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे, अटलबिहारी वाजपेयी, कॉ. डांगे अशा सर्वाशी त्यांचे सौहार्दतेचे, स्नेहाचे संबध होते. पक्षातील सर्व वरिष्ठ नेते कौतुकांन त्यांना ''सुशील'' या नावानं संबोधतात यातच त्यांच्या विषयीची असणारी आपुलकीची आणि आपलेपणाची भावना लक्षात येते.

पुस्तकाच्या शेवटी प्रकाशाच्या वाटेवरील प्रवास या शीर्षकाखाली जन्मापासूनचा त्यांचा प्रवास, कौटुंबिक, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा, साहित्य अशा विविध क्षेत्रांतील महत्वाचे टप्पे, मानसन्मान, पुरस्कार, भूषविलेली विविध पदे इत्यादि संदर्भातील तारीखवार सूची दिली आहे. त्याचबरोबर मंत्रिपद, त्याचा कार्यकाल, विविध खाती यांची माहिती दिली आहे. शेवटच्या पानावर संदर्भ सूची दिली आहे.

पुस्तकात ठिकठिकाणी अवतरण चिन्हात सुशीलकुमार शिंदे यांचं मनोगत, त्यांचे विचार वाचताना त्यांच्यामधील लेखन समृद्धता, विचारांची बैठक, ओघवती भाषाशैली, तिची प्रगल्भता आणि अभ्यासू वृत्ती हे सर्व प्रकर्षने जाणवतं. त्याची उदाहरण देण्याचं मुद्दाम टाळत आहे. वाचकांनी ते पुस्तकात वाचावं आणि अनुभूती घ्यावी, आस्वाद घ्यावा अशी इच्छा आहे. या मनोगतांनी पुस्तकाची उंची वाढण्यात निश्चितच मदत झाली आहे. आकर्षक, मनोवेधक आणि रंगतदार, कलात्मक मुखपृष्ठावरून पुस्तक ''दर्जेदार'' असल्याचं जाणवतं.

पुस्तकाची सुरुवात करताना एक आटपाट नगर होतं... असं सांगून सोलापूर शहराची ऐतिहासिक, भौगोलिक, राजकीय आणि सामाजिक व सांस्कृतिक परिस्थिती व महती लेखकाने सांगितली आहे. तशीच सुशीलकुमारांची कौटुंबिक माहिती, वंशावळ कथित केली आहे. साहित्य रसिकांनी हे पुस्तक जरूर वाचावं असं आवार्जून सांगावसं वाटतं. पुस्तकाची किंमत जरी चारशे रुपये असली तरी त्याचं देखणेपण, गुणात्मकता, नेटकी मांडणी आणि ११० ही पृष्ठ संख्या आणि ''रिचनेस'' या बाबींचा विचार करता ती जास्त आहे असं वाटत नाही. मात्र अशा भारी पुस्तकात ''मार्कर'' (ग्रंथखुण) असणं जरूरीचं होतं.

असो, परीक्षण लेखाचा समारोप करताना ''यत्न तो देव जाणावा'' या समर्थ वचनाप्रमाणे कठोर परिश्रम, प्रयत्न, प्रचिती, जिद्द, आत्मविश्वास, सामंजस्यवृत्ती आणि कुशल नेतृत्व, संघटन कौशल्य या गुणांमुळे प्राप्त परिस्थितीला चरित्रनायकाने धैर्याने, समर्थपणे तोंड दिलं आणि जीवनात ते यशस्वी झाले. जाती, धर्म, वंश, पंथ या सर्व सीमा पार करून त्यांनी आपला व समाजाच्या उत्कर्ष, आपलं धेय्य प्राप्त केलं, असे नमूद करावेसे वाटते.

प्रकाशाची वाट -परचुरे, अप्पा
मुंबई, परचुरे प्रकाशन मंदिर, २००८.

**श्री. सुरेंद्र लागू**

२ / पहिला मजला,
यमुना सोसायटी,
गोविंद बच्चाजी रोड,
चरई, ठाणे (प.)
दूरध्वनी - २५३४९३४१

●●●

| महाराष्ट्र | ५० वर्षापूर्वी | आज |
|---|---|---|
| रस्त्यांची लांबी | ३९,२४१ कि.मी. | २,३३,६६४ कि.मी. |
| चालू कारखाने | ८,०१० | ३०,६८४ |
| साक्षरता | ३५.१ % | ७६.९ % |
| प्राथमिक शाळा | ३४,५९४ | ६९,३३० |
| दरडोई उत्पन्न (वार्षिक) | ५३३ रु. | ४१,३३१ रु. |
| रुग्णालये | २९९ | १०४७ |
| जिल्हे | २६ | ३५ |
| सिंचन क्षेत्र | १२,२०,००० हे. | ३६,६५,०००हे. |
| सहकार संस्थांचे खेळते भांडवल | २९१ कोटी एक लाख ८८ हजार | ३१० कोटी रु. |

## अभिमान वाटावा

| | | |
|---|---|---|
| महाराष्ट्रातील भारतरत्न | - | ७ |
| महाराष्ट्रातून सरन्यायाधीश पद भूषवणाऱ्या व्यक्ती | - | ४ |
| लोकसभेचे सभापतिपद भूषवणाऱ्या व्यक्ती | - | ४ |
| विश्वकल्याणाचे स्वप्न पाहणारा पहिला संत | - | श्री ज्ञानेश्वर महाराज |
| घटनेला अधिष्ठान देणारे | - | डॉ. बाबासाहेब आंबेडकर |

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना

*या विषयावरील लेखांत आलेल्या विचारांचा मागोवा जून, जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर २००९ च्या अंकात घेत आहोत. यातील उर्वरीत भाग ऑगस्ट २००९ च्या अंकात समाविष्ट केला जाईल - संपादक*

**प्रास्ताविक :**

भारतीय संस्कृतीवर सन २००४ पासून जवळ जवळ दरमहिन्याला सातत्याने लेख लिहीत आलो. त्याचा अत्यंत 'संक्षिप्तपणे' आढावा घेण्याचा उपक्रम दिशाच्या जून २००९ च्या अंकापासून मी नव्याने सुरू केला. हेतू हा की, अंदाजाने एक, दोन अंकात सामावणाऱ्या ह्या आगामी आढाव्यातून, नवीन वाचकाला काही शोध घेता येईल व मलाही ह्या थोड्याशा मुक्त चिंतनातून एक निश्चित अशी भारतीय संस्कृतीची व तिच्या स्वरूपाची, तिच्या मूळ बीजाची व भविष्यातील वाटचालीची एक भक्कम शास्त्रीय बैठक प्राप्त होईल. माझ्या अवलोकनांत 'संस्कृती या विषयाची अशी 'स्पिरीच्यूअल शास्त्रीय' चिकित्सा आढळली नाही.

संस्कृतीची वर्णने बहुतांशी केवळ वर्णनात्मक किंवा काही सर्वसाधारण जीवनमूल्यांच्या वैशिष्ट्यांची अशी केली जातात. सामान्य वाचकही ह्या मनोरंजनात्मक, कुतुहूलजन्य वर्णनापुढे संस्कृतीची जाणीव, ज्ञान वा बोध व्हावा ह्या अपेक्षेपर्यंत अजून तरी आला नाही. सर्वसाधारणपणे, ही संस्कृती केवळ व फक्त मानवी सृजनशक्तीचाच अविष्कार, असे मानले जाते. पाश्चात्य आधुनिक विचारवंत त्याच्या समाजशास्त्रातही हाच विचार मांडीत असतात. शिवाय भारतीय संस्कृती काही जगातील इतर संस्कृतीपेक्षा पूर्णपणे-मौलिक व निराळी आहे असे मानत नाहीत.

**दैवी भारतीय संस्कृती :**

पण, मला मात्र ठासून असे सांगावयाचे आहे की भारतीय संस्कृती ही काही योगायोगाने व दिशाहीन वर्धिष्णू होणारी प्रवाहपतित अशी चीज नाही. **ह्या संस्कृतीची बीज संकल्पना वेदाच्या सृष्टी निर्मीतीत घडवली आहे.** त्या संस्कृतीच्या प्रसार व वर्धनासाठी लागणारी सर्व साधने, प्रकृतीने उपलब्ध करून दिली आहेत. शिवाय, या संस्कृतीची जोपासना शिस्तबद्ध व स्पिरीच्यूअल संस्कार क्रियासाधनांनी संबंधित व जतन केली जाते आहे. उदाहरणार्थ हिंदू समाजाच्या १६ संस्कार क्रिया.

**कोणती ही साधने ? :**

एक तर भारतात जन्म घेणाऱ्या जीवात्म्याची नेमणूक कुठल्या प्रदेशांत, कुठल्या कुलांत होते, याबद्दल जरी प्रचलित भौतिक शास्त्रात 'अंधार' असला, तरी वेदज्ञानावर आधारलेल्या सर्व शास्त्रांत याची सुसंबद्ध, सुरक्षित व योजनाबद्ध व्यवस्था दिसून येते. जीवनात अन्न व पाणी यांची मुबलकता. वातावरणातील संतुलन हा काही ''नशीबाचा भाग'' आहे, अशा अर्थाने नव्हे, तर दैवी आशीर्वाद!!

हिमालयावरील बर्फाच्या साठ्याबद्दल एक विधान असे आहे की गंगा, यमुना वगैरे नद्यांच्या बारमाही प्रवाहाला हा एक खंदा आधार उपलब्ध आहे.

प्रत्यक्ष भारताचा भूभाग हा ज्या उलथापालथीतून निर्माण झाला, त्याचा इतिहास '**Earth in upheaval**' ह्या ग्रंथात वैज्ञानिक आधारावर मांडला गेला आहे.

हिंदुस्तान, आफ्रिका व अमेरिका ह्या देशांचे निमुळते दक्षिणेकडचे भूविभाग हे एका धूमकेतूच्या पृथ्वीला दिलेल्या धक्क्याने झाले व त्यामुळे त्याला जिऑलॉजीशास्त्रामध्ये

"**Continental Drift**" म्हणतात. भूभागाच्या हालचालीने, हे आजचे स्वरूप प्राप्त झाले. एव्हढेंच नव्हे तर ह्या पृथ्वीचा Axis (आंस) हा थोड्या अंशाने कलला व त्यामुळे ऋतू, दिवस, रात्र ह्याचे सध्याचे नाते व बदल निश्चित झाले. हे अर्थात भारताच्या दृष्टीने जास्त उपयुक्त व मानवी जीवनाच्या प्रगतीकरिता स्थैर्य व वैभव प्राप्त करून देणारे ठरते.

हा सर्व प्रकार केवळ एक नैसर्गिक घडामोड आहे असे बेधडक व निर्विकारपणे म्हणणारे विचारवंत भौतिक बुद्धिवादी या घडीस सामान्य जनमानसावर पकड घेऊन बसले आहेत. **पण, ही एक निश्चित 'दैवी' योजना आहे. व त्याला ईश्वरी आशीर्वाद आहे असा विश्वास बसायला भरपूर जागा आहे.** भारतात 'आध्यात्मिक वृत्ती'ची जी सतत जोपासना होते व बदलत्या राजकीय, आर्थिक, सामाजिक उलथापालथीतही, प्राथमिक पण विश्वासवर्धक अशा **जगन्नाथाचा रथ, अमरनाथची यात्रा तीर्थस्थळे, धार्मिक संप्रदाय, नाथपंथीय व तत्सम योगसाधना वगैरे काही 'दृश्य चिन्हे' समाजमनावर प्रभुत्व गाजवून प्रतिकूल राजकीय विश्वासातही व अंमलातही आजही जिवंत आहेत. याचे, काय बरे कारण असेल? 'रामायण' व 'महाभारत'** ह्या काही निव्वळ कथा नव्हेत, म्हणजे 'War of Troy' किंवा ''Snowhite'' सारख्या, तर, त्यातून 'भगवद् गीता' व 'आध्यात्मिक रामायण' यांची निर्मीती होते व जीवनाला एक आध्यात्मिक अर्थ, सातत्याने प्राप्त होतो. ही किमया का घडते?

**'वेदपठण'** हे एक '**Miracles of Memory**' असे '**Vidic Documentory** मधून सांगितलेली 'सत्ये' काय दर्शविते? वेद हे ईश्वरनिश्वसित ज्ञान ह्या मानवाला सतत प्राप्त व्हावे, हा उपद्व्याप कोणत्या वैश्विक धारणेने व सातत्याने पिढ्यानपिढ्या युगानयुगे घडत राहिला आहे? आणि का, व कशासाठी? कोणता नैसर्गिक हेतू ह्याच्या मुळाशी आहे?

त्यामुळे, भारतीय संस्कृतीकडे एक ''Chance happening'' असे पहाणे 'अज्ञान निदर्शक' ठरेल, नाही का? मग, ह्या भारतीय संस्कृतीच्या निरनिराळ्या खुणा कां व कशा जतन होत राहिल्या असतील बरे? त्यात काय दिव्य हेतू आहे?

ह्या भारतीय संस्कृतीचा अभ्यास, म्हणूनच, केवळ भारतीयांनाच नव्हे, तर सर्व मानवजातीला आवश्यक ठरावा.

ह्या अभ्यासाने काय साधेल? हा अभ्यास एका व्यक्तीचा, एका पिढीचा, एका युगाचा भार मानणे योग्य नव्हे, तर त्याचे उत्तर अनंतातील सांस्कृतिक प्रवासात आहे.

मानवी जीवनाचे खरे प्रश्न जन्म, मृत्यू तर आहेतच, पण पिढ्यानपिढ्या, युगानूयुगे, हा जो मानवी जीवनाचा, या भारतभूमीवर '**जीवनप्रवाह**' चालला आहे, **हा एक सांस्कृतिक व आध्यात्मिक लढा आहे.** मानवाच्या स्वत:च्या अज्ञानावर मात करण्यासाठी!! स्वत:च्या इंद्रियांच्या, मनाच्या, बुद्धीच्या सुसंस्कृत उंचीसाठी!! जीवनाचे कोडे सोडवण्यासाठी!!

**शील व कुल :**

आपण गेल्या काही अंकात '**शील व कुल**' ह्या '**कृष्टि**' पद्धतीच्या सांस्कृतिक क्रिया व संकल्पना पाहिल्या, त्यांचा उगम, 'ऐतरिय ब्राह्मणात' मिळतो.

**कोणी ही ब्राह्मणे लिहीली? कां? हेतू कोणता? :**

डॉ. निहार रंजन राय यांच्या 'आमुख निबंधात' (Key note & Essay) यात त्याचा उल्लेख पुन्हा आधुनिक काळात केला गेला.

**'दिशा' जानेवारी २००९ :**

त्यात '**देवशिल्प**' व 'मानुषशिल्प' ह्या

‘**शिल्पक्रिया**’ सुद्धा पाहिल्या. ह्याचाच अर्थ ‘**भारतीय संस्कृती**’ ह्या **वैश्विक वास्तुशिल्पाची** रचना, आकार व ध्येये गाठण्यात कार्यरत आहे!!

ही देवाकडून व मानवाकडून अशा दोन्ही पद्धतीने घडवली जात आहेत. हा एक ‘**अनंताचा प्रवास**’ आहे.

ह्या दैवी व मानवी शिल्पशास्त्र, वास्तुशास्त्र याचा शोध आपण, ‘**वास्तुशास्त्र उपनिषद**’ ह्या मार्गाने पुढच्या अंकातून घेऊच!

आपला मागील आढावा सप्टेंबर २००५ इथे थांबला होता. यापुढचा आढावा आता घेऊ या.

**जानेवारी २००६ पृष्ठ क्र. १७-२४ :**

पृष्ठ क्र. १७ - भारताचे शैक्षणिक धोरण काय असावे. राष्ट्र, समाज संकल्पना कोणत्या? ‘ज्ञान’ म्हणजे काय? मटेरिऑलिस्ट एपिस्टेमॉलॉजी.

पृष्ठ क्र. १८ - वैदिक संकल्पना.

Progress and utility?

Physics and Maths - ?

रंगी, शिंगी जोडी निधर्मी ज्ञानशास्त्र -Seculsr Epistemology

पृष्ठ क्र. २० - Godel's theorem- गोल चेंडूचे ‘दोनट’ रूपांतर? (Ball - Do-Nut Transformation)

ईश्वरी सत्ता, प्रत्येक गणिती सिद्धांताला भोक पाडील.

शास्त्रीय नियम मानव निर्मीत की ईश्वर निर्मित?

Theory of Everything Intelligent design - ?

पृष्ठ क्र. २३ - डार्विनची Black Box-by Michael J. Behe - ''the inability of mutation and selection to produce ''irreducible Complexity"

ज्ञान पद्धतीतील सांस्कृतिक भेद सांस्कृतिक संघर्ष

पृष्ठ क्र. २४ - पाश्चात्य गोंधळ

**फेब्रुवारी २००६ पृष्ठ क्र. ७ - १२/१९ :**

पृष्ठ क्र. ७ - वैदिक सनातन संस्कृति शिक्षण ज्ञान संकल्पना.

पाश्चात्य दूषित वैचारिक बैठक

Man- observer - or participant?

- John A. Wheeler

"Vedic View" - Cosmic order controlled by a fundamental moral principle - ऋत व सत्य अतींद्रिय ज्ञान, ज्ञानाचा हेतू? ज्ञानाची पातळी - मानवी क्षमता.

भौतिकवादी विज्ञानाची गुलामी व अंमल

पृष्ठ क्र. १९ - महर्षी अरविंद घोष यांचे भाष्य? inner life of man भारतीय निद्रावस्था



महायोगी अरविंद

**मार्च २००६ पृष्ठ क्र. ८ ते १६ :**

पृष्ठ क्र. ८ - Creation Theory - वेदातील विश्व निर्मीती संकल्पनेचा प्रभाव सर्व ज्ञान व शास्त्रांवर आत्मज्ञान आवश्यक!!

पृष्ठ क्र. १० - वेदश्रुतीज्ञान आवश्यक कां?

वेदिक प्रमाण Validity, सांप्रदायिक, योगिक अर्थ पद्धती, ज्ञानाचे पुढच्या पिढीला संक्रमण

पृष्ठ क्र. १३ - १६, संस्कार क्रिया, उपनयन वगैरे संस्कारांचे महत्त्व.

पृष्ठ क्र. १४ - ''अग्न्याधान'' म्हणजे काय?

मेधाजनन व पळस वृक्ष डॉ. आर. पी. थत्ते व गायत्री व इतर वेदिक छंद

भावार्थ, संप्रदायार्थ, निगमोक्ष, सर्वरहस्य, भौतिक अर्थ म्हणजे काय? डॉ. डोंगरे - अभ्यासक - अर्थ लावण्याची पद्धत.

पृष्ठ क्र. १५ - डॉ. धनंजय डोंगरे मुलुंड यांचा उपनयन शब्दाचा अर्थ. नय चा अर्थ - योजना, उपाय, शास्त्र, पंथ दाखविणारा असाही आहे. कोणता हा पंथ व योजना?

महाभारतात अनुशासन पर्वात (अध्याय ३४) ब्राह्मण जो धर्माला जाणतो, तो केवळ 'मेधेच्या' योगाने.

मेधा - धी - धारणावती मेधा. मेधते संगच्छते सर्वस्याम। धर्म, वेद यांचा उगम ज्यापासून - त्या वैश्विक शक्तिपाशी - भगवंताशी - ज्याची बुद्धी जाऊन विसावली, त्यालाच परमात्म्याने सांगितलेल्या धर्माचे यथातथ्य ज्ञान होते.

बटूच्या बुद्धीवर होणारा संस्कार - काँशसनेस मध्ये मूलगामी बदल करणारी प्रवृत्ती, शक्ती मिळणारा आहे. हा भारतीय संस्कृतीचा हेतू आहे... पुढील वैश्विक, प्रवासातले 'व्रताचरण' आहे.

राजकारणात - संस्कृतीचा देखावा - वरवरचा संस्कृतीचा खऱ्या अतुलनीय वैश्विक आवाक्याची थोडी तरी जाणीव ठेवावी, शिक्षण उद्दिष्टांमध्ये बदल व्हावा.

**मे २००६ पृष्ठ क्र. १०-१७ :**

पृष्ठ क्र. १० - वैश्विक योजना, मेधावी संस्कृती

पृष्ठ क्र. ११ - Bio plant Radar, डॉ. जगदिश चंद्र बोस अग्नि व यज्ञ, आध्यात्मिक यज्ञक्रिया, Vedic Symbolism, डॉ. काशीकर, महेश योगी.

पृष्ठ क्र. १४ - Vedic unified field

पृष्ठ क्र. १६ - अव्यक्तातील जागृत, 'आवाहानुकूल' अग्नी डॉ. विष्णुकांत वर्मा 'ऋचा मे जागृवत शब्द ज्ञान मे जाग्रत के लिये आया हैं - अग्निला ''हनिषमत'' - विशेषणाचा खरा अर्थ

**जून २००६ पृष्ठ क्र. ११-१७ :**

पृष्ठ क्र. ११ - यज्ञ रहस्य - वैश्विक यज्ञ क्रिया,

"Mutual Exchange Relation"

पुरुषसूक्त - नारायण ऋषी रचित - यज्ञ संकल्पना निर्मीती - हेच बीज.

पृष्ठ क्र. १३ - श्री. दंडगे यांचे भाष्य

पृष्ठ क्र. १४ - Antonio Nicolas, Epistemology of Nature, Epistemology of the will of God

पृष्ठ क्र. - 'अश्वमेध' - घोडयाचा संहार आहुती? अश्व घोडा नव्हे. बृहद अरण्यकातील प्रतीक मेध? आहुती?



पृष्ठ क्र. १६ - स्वामी जगदीश्वरानंद व माधवानंद - रामकृष्ण मठ - भाष्य विश्व हे 'अश्वाच्या' (घोड्याच्या?) टापाखाली?

**जुलै २००६ पृष्ठ क्र. ९ - १६ :**

पृष्ठ क्र. ९ - Curltural Revolution - Marxist - China - Maotse Tung

नाझी - ज्यू संहार - जर्मन Master Race ह्या मानवी Genctic Engineering च्या संकल्पना

पृष्ठ क्र. ९/१० - जर्मन सांस्कृतिक प्रयोग - डार्विनचे Evolution भाष्य Social Darwinism Eugenic Program, Gunther, जर्मन आर्यन रेस

पृष्ठ क्र. ११ - विज्ञानाधीष्ठित फसलेला आसूरी सांस्कृतिक प्रयोग - जर्मनी.

कॉ. डांगे, श्री. बानी देशपांडे व ''Universe of Vedanta''

पृष्ठ क्र. १२ - ओझरता उल्लेख भारतीय संस्कृती पद्धतीचा ''बीज संकल्पना'' सुयोग्य हव्यात.

पृष्ठ क्र. १२/१३ - चिनी प्रयोग - संपूर्ण चीनी नागरिकाचा ''स्वभाव बदलावयाचा प्रयोग भांडवलशाही व सुधारणावाद यांतील दोषांतून त्यांना वाचवायचे''

Roderick Macfarguhar चे भाष्य अर्जून सिंग, डॉ. मुरली मनोहर जोशी व M. F. Hussein

पृष्ठ क्र. १४/१५ - Gang of Four - china - cartoon.

पृष्ठ क्र. १६ - भांडवलवादी (अमेरिकन) संस्कृती, भारतीय संस्कृती (निसर्ग)

**जानेवारी २००७ पृष्ठ क्र. ८-१४ :**

पृष्ठ क्र. - पुरुषसुक्तामधील 'यज्ञ' संकल्पना. चिरंतन बीज यज्ञ निर्मीत

दशांगुले पुरुष - संकल्पना १६ सुक्तात. Act of imagination - यज्ञकर्म 'संगतीकरण', भूमी व दान मूळ संकल्पना, बीज हा 'देवोपहार' आहे. फक्त 'देवच हा दान व्यवहार' करतो.

गो:, मेधा संगतीकरण वेदिक संकल्पना.

आलंभन, संज्ञपन हा मेधक्रियेचा हेतू पशुभाव काढून टाकण्याची क्रिया

Cultural - psychological कृती अग्नि, अश्व, उर्ध्वरेत, सोमयाग ह्या क्रिया व संकल्पना

वैश्विक अग्नि संकल्पना, महायोगी अरविंदाचे ''Hymns to the Mystic Fire''

जातवेद - संकल्पना - प्रतिकातून बोध व कृती.

इष्टि, पूर्ति व छिद्र - डॉ. रामनाथ वेदालंकार

हृदय ही अग्निशाला - धृत हे रेत (semen), अस्थि ह्या समिधा बुद्ध टीका, यज्ञाचे भविष्य

**फेब्रुवारी २००७ पृष्ठ क्र. ७ ते १३ :**

पृष्ठ क्र. ७ - गोव्याची International Conference - "Ancient Wisdon brought to Modern Times" - कला ॲकेडमी, गोवा (पणजी) तेथे 'माझा पेपर' - गोवा ता. ८-१० फेब्रुवारी २००७

माझा सारांश - "Adoption of the vedic wisdom to Human life for Evolution to Divine Consciousness."

Global warming - The Green house effect

Rawlsian Equity

भविष्यातील पिढीचे कल्याण संभाळण्याची जबाबदारी ही प्रत्येक मावळत्या सद्य पिढीची असते - शहाणपणाचे तत्वज्ञान

पृष्ठ क्र. ९ - निधारी व नॉईडा (India) येथील लहान मुलांचे मोर्चे - फलकावर

''हमे भी जीने का अधिकार दो हमारी हत्या बंद करो.''

'' पैशाला पाप चिकटते का?''

Where is Wisdom lost in knowledge? Where is knowledge lost in information

- T. S. Elliot

पृष्ठ क्र. ११ - ग्रीस देशातील शहर Delphi हे Temple of Apollo-source of Wisdom

पृष्ठ क्र. १२ - माझी व्याख्या

The quality of wisdom of any individual, group or society of Human beings is

commensurate with the level or status of Consciousness either specific or average.

For example, the wisdom gained in a materialistic paradigm is diferent than the integral and or from spiritual paradigm.

The reason being all are relative concepts and not ontological.

वैष्णव व लक्ष्मी तंत्र -

संकर्षण, प्रद्युम्न व अनिरूद्ध - वासूदेव Mr. J. M. Mukherjee - (Aurobindo अनुयायी)

'Economics has to be reoriented to be natural i.e. reasonable and in tune with Nature.

महायोगी अरविंद -

The present Industrial, Commercial, Economic age is characterised as 'Vitalistic Barberism'


पुरुषोत्तम - परिपूर्ण मानव मार्ग

**मार्च २००७ पृष्ठ क्र. १० - १६/३२ :**

पृष्ठ क्र. १० - भारतभूमीवर, **<u>वैदिक संस्कृतीचा वारसा</u>** ''हिंदू समाजाच्या जिवंत अस्तित्वामुळे प्रत्येक भारतीयाला मिळतो. ह्या क्रियेला 'संस्कार क्रिया' असे म्हणता येईल..'' ''तिचे काही अवशेष ज्या कर्मकांडी किंवा धार्मिक क्रिया किंवा कौटूंबिक संस्कार, 'समारंभाच्या' कृती मध्ये दिसतात, त्यांचाही शुष्क 'अस्थि सांगाडा' अस्तित्वात आहे व त्यातील सशक्त चैतन्य युक्त रहस्यात्मक 'आगम' अश्या मानसिक, स्पिरीच्यूअल क्रिया नष्ट झाल्या आहेत.

''... **<u>ह्या संस्कारक्रियेचा वैदिक अर्थ व विनीयोग पूर्णपणे पुनरूज्जीवित व्हावा</u>**...

पण, त्यासाठी एक विशेष आवश्यकता महत्वाची आहे. 'भारतीय वैदिक विश्व रचनेचा आराखडा, आशय व त्यावर विश्वास असणे निर्णायक स्वरूपाचे आहे.




''चित्र नं. १ मध्ये ही यंत्रणा प्रतिकात्मक पद्धतीने दर्शविलेली आहे.

पृष्ठ क्र. १३ - "Foetus is a Consumer", the court verdicf"

वेदज मनसीज सृष्टी - बीज निर्मीती १. उद्भिज २. स्वेदज ३. अंडज ४. जारज ही चतुर्विध सुष्टि प्रसिद्ध आहे. विश्वनिर्मीतीच्या काळात

केवळ 'संकल्पनशक्तिने', म्हणजे 'ज्ञानावर', निर्माण होते. याची संकल्पना जाणिवेत नाही. 'बीज' हे अशा क्रियेनेच निर्माण झाले.

त्यामुळे, पुरुषसुक्तात (ऋग्वेद) उल्लेखलेल्या एका प्रकारच्या यज्ञ क्रियेने 'बीज' रूपाने सृष्टि निर्माण झाली व वृद्धिंगत झाली.

पृष्ठ क्र. १४ - **संस्कार शून्य** सामाजिक बदल. **'दैविकशास्त्र', एकात्म मानव दर्शन, श्री. १०८ सोंबारी महाराज, पंडित दीन दयाल, प. पू. गोळवलकर गुरूजी, परिपूर्ण मानव महायोगी अरविंद यांचे** ''Life Divine'' दैवीसंपदा समाज, भगवद्‌गीतेतील पुरुषोत्तम योग, ज्ञानेश्वरांची 'सज्जनांची मांदियाळी'

**एकाच दिशेने समाजाच्या परिवर्तनाची इच्छा व आदर्श व्यक्त केलेले आढळतील. पण मग त्यासाठी शास्त्रीय प्रयत्नांची आवश्यकता आहे.**

जन्मातर, सहज, कृत्रिम, अन्वयागत चार तऱ्हेचे संस्कार - आधिजीविक, आधिजननिक शास्त्रे

पृष्ठ क्र. १५ - **श्रद्धा व लज्जा - यांचे जितके आधिक्य असेल तितका तो समाज श्रेष्ठ होतो.**

**सामुद्रिक शास्त्राप्रमाणे** अंग व नाडी यांचा स्वभावाशी अत्यंत घनिष्ट संबंध राहत असतो. स्वामी दयानंद सरस्वती (आर्य समाज) - 'संस्कारविधी'

पृष्ठ क्र. १६ - **पाश्चात्य प्रभाव** - Tabula Rasa - The mind is at birth a clean sheet - जे. लॉक

पृष्ठ क्र. ३२ - निसर्गाची भागीदारी धर्म व संस्कार क्रिया.

**एप्रिल २००७ पृष्ठ क्र. १०-१६ :**

पृष्ठ क्र. १० - **नेकर क्यूब** (Necker Cube)भ्रमचित्र **Honest Perceptions of Two irreconciable realities म्हणजे ''प्रामाणिकपणे दिसणाऱ्या दोन 'सत्यदर्शनातील' अपरिवर्तनीयता'**

**एकदा ह्या दोन्ही सत्यांची दर्शने Consciousness ला झाली की पुन्हा पहिल्या 'A' च्या बांधिलकीतून मुक्तता होते व** 'C' ह्या तटस्थ किंवा 'सम्यग्' पातळीवर दोन्ही सत्यांचे निर्विकार असंघर्षमय दर्शन प्राप्त होते.

(दोन दर्शने) 'पशुवत दर्शन'अगा मी ब्रह्मची पाहिले!!

पृष्ठ क्र. ११ - 'C' स्थिती प्राप्त करणे मानवी समाजाला आवश्यक आहे. ''Bourne idenfity'' गाजलेली हेरकथा (Hollywood) ''आपल्या अस्तिव (आज जाणिवेत असलेल्या) जपण्याच्या ह्या एक मात्र

सूत्राचा - धागा दोऱ्याचा उपयोग करण्याखेरीज त्याला दुसरा कुठलाच प्रत्यवाय राहिला नव्हता.''

पृष्ठ क्र. १२ - दूसरा चित्रपट '**Matrix**' - Triology (Hollywood)

We are caught in the Matrix of the mind and so do not realise the Consciousness the source of every thing is the very source of our being.

**Ken Wilber** केन विल्बरचे चित्रपटावरचे भाष्य

पृष्ठ क्र. १३ - **दिपक चोपरा (M.D.) - गाजलेल्या Quantum Healing पुस्तकाचे लेखक**

**त्यांचे महत्त्वाचे म्हणणे हे आहे कीं आम्ही शरीरी मानवाचे जे मॉडेल गृहीत धरले आहे किंवा सध्या प्रचलित व राजमान्य आहे, तेच चुकले आहे.**

जे नविन विश्वचित्र उलगडीत आहे, त्याला **Psycho Physiological Science fo Consciousness** असे स्वरूप आहे.

पृष्ठ क्र. १४ - **''The Body is not a machine, that learns to think, but that the body is a spiritual 'thought' that reflects itself into form.**

**It is one level in a hierarchy of coherent or intelligent energy states**

पुन्हा वेदांकडे - इच्छाशक्ति, ज्ञानशक्ति, क्रियाशक्ति

पृष्ठ क्र. १५ - पुन्हा चोपरा

**होलोग्राफिक मॉडेल - प्रिबम (१९७१) ''न्यूरो बायालॉजिकल ट्रॅन्सडयूसर''** - (आपला मेंदू म्हणजे) मानसिक - जैविक भाषांतर करणारा यंत्राचा भाग

पृष्ठ क्र. १६ - पण हे विश्व काही मानवी तर्कावर चालत नाही. त्याची निर्मिती, उत्क्रांती एका विशिष्ट दिशेने वाटचाल करत आहे.

**देव की चित्रपट ? वैदिक ज्ञानप्रकाशाचा दीपस्तंभ** - त्याकडे मानवी समाजाचे पुढारी दुर्लक्ष करीत आहेत.

**पुढचा दिशा अंक :**

या पुढील २००८ व २००९ या लेखातील व पूर्ण आढावा पुढील दिशाच्या अंकात घेऊं या.

**श्री. यशवंत साने**
सोनल अपार्टमेंट,
सारस्वत बँकेशेजारी,
अग्यारी लेन, ठाणे.
दूरध्वनी - २५३६८४५०
मोबाईल - ९००४०५१८४७
E mail : Saneyr@mtnl.net.in

●●●

# निष्ठावान ग्रंथोपासक - शरद जोशी

*३० जून या दिवशी श्री. जोशी यांचा वाढदिवस होता. त्यानिमित्त डोंबिवली येथील श्री. जयंत गोखले यांनी त्यांच्या कार्यकर्तृत्वावर टाकलेला प्रकाश...! दिशामधून श्री. जोशी सातत्याने लिहीत असतात - संपादक*

कुणीतरी म्हटले आहे की, मनाची उंची, व्याप्ती, खोली व संवेदना शक्ती वाढविण्याचा एकच मार्ग सहज साध्य आहे, तो म्हणजे वाचन. साध्या साक्षरतेमुळे आणि वाचनकलेमुळे हे एक आकारसाधन माणसाच्या हातात येते आणि त्यामुळे अनंताचा, मानवाचा, निसर्गाचा किंवा सर्व चराचर सृष्टीचा संवाद मनाशी होऊ लागतो तो वाचनामुळे! बुद्धी सदा सतेज ठेवण्याचे वाचन हे एकच साधन आहे. आजच्या माणसाला ते साधन माहीतही आहे; पण वाचनाची आवड नाही हा काही लोकांच्या बाबतीत दैवदुर्विलास होय! वाचनाचे हे महत्त्व लहानपणीच उमगलेला आणि 'लो. टिळकांचा ग्रंथ हे आपले गुरु आहेत', हे सुवचन शिरोधार्य मानून अहोरात्र ग्रंथाचा प्रचार - प्रसार करणारा एक डोंबिवलीचा निष्ठावान ग्रंथोपासक आहे. त्याचे नाव आहे शरद वामन जोशी.



**श्री. शरद जोशी**

**आगळा वेगळा ग्रंथप्रसारक :**

क्रिकेट, मुक्तपत्रकारिता, समाजसेवा, पत्रमैत्री, उत्तमोत्तम कार्याचा, उपक्रम योजना यांचा अव्याहत प्रचार - प्रसार करणारा एक आगळा - वेगळा ग्रंथप्रसारक म्हणून सारा महाराष्ट्र शरद जोशींना ओळखतो. नॅशनल बुक ट्रस्ट, साहित्य अकादमी यांची उत्कृष्ट व त्यामानाने स्वस्त असलेली पुस्तके आणि महाराष्ट्रातील अनेक नामवंत प्रकाशन संस्थांच्या पुस्तकांचा प्रसार करणे हे काम गेली ५० वर्षे ते अहोरात्र करत आहेत. त्यामुळे लेखक, वाचक व प्रकाशक या मंडळींनी ग्रंथप्रसारक ही पदवी केव्हाच बहाल करून टाकलेली आहे. ऊन, वारा, पाऊस आणि प्रत्येकाच्या जीवनात येणाऱ्या अडीअडचणी यामुळे श्री. जोशी कधीही विचलित होत नाहीत. त्यांचे प्रसाराचे कार्य सातत्याने चालू असते. 'कमी तिथे आम्ही' हा त्यांचा स्वभाव विशेष आहे. झोकून देऊन काम करणे, ही त्यांची वृत्ती आहे.

**हाडाचा कार्यकर्ता :**

अशा या मनस्वी शरद जोशी यांचा जन्म डोंबिवली येथे ३०-६-१९३६ या दिवशी झाला. वयाच्या १५ व्या वर्षापासूनच त्यांनी विविध प्रकारची छोटी मोठी समाजकार्ये सुरू केली. आयुर्विमा महामंडळात त्यांनी ४२ वर्षांची प्रदीर्घ सेवा इमाने इतबारे केली. तेथेही चळवळे जोशी कधीही स्वस्थ बसले नाहीत. कार्यालयामध्ये युनियन, महाराष्ट्र मंडळ, नाट्य मंडळ इ. क्षेत्रात त्यांनी मनोभावे व सक्रिय भाग घेतला. ३०-६-१९९६ या दिवशी ते निवृत्त झाले. डोंबिवलीतील विद्या निकेतन, डोंबिवली ब्रिज क्लब, डोबिंवली इतिहास मंडळ, कलासंगम इ. अनेक संस्थांशी त्यांचा घनिष्ठ संबंध आहे. हाडाचा कार्यकर्ता, अशी त्यांची ओळख करून दिली जाते.

शांत समुद्र कधीच कुशल खलाशी बनवत नाही.

**लेखन, पत्रमैत्री व ग्रंथप्रसार :**

१९५५ ते साधारणपणे १९७५ पर्यंत त्यांनी विविध प्रकारचे स्फुट लेखन केले. पुणे येथील खूप जुने साप्ताहिक ‘दीनबंधू’ यामध्ये त्यांनी ‘हास्यात खरोखर जग जगते’ हे सदर चालवले. गोव्याच्या साप्ताहिक ‘मांडवी’ मध्ये ललित लेख लिहिले. अमृत, संजय या ‘डायजेस्ट’ मधून किरकोळ लेखन केले. लोकप्रभा, क्रीडाजगत (मिरज) आणि ‘क्रीडांगण व क्रीडा जगत’ या क्रीडाविषयक मासिकांतून ‘क्रिकेट’ व ‘ब्रिज’ या विषयांवर लेखन केले. ‘कॉन्ट्रक्ट ब्रिज’ विषयांवर महाराष्ट्रातल्या सुमारे २५ नियतकालिकांतून लेख लिहिले. १९७१ मध्ये त्यांनी ‘तुम्हीच ब्रिज शिका’ व ‘उत्तम ब्रिज कसे खेळावे?’ ही ब्रिजवरील पुस्तके लिहिली आणि १९८७ ते १९९५ पर्यंत याच विषयातील ‘ब्रिज’ मासिक चालविले होते; मात्र गेली ३५ वर्षे त्यांनी आपले सर्व छंद बाजूला ठेवून केवळ पत्रमैत्री व ग्रंथप्रसार या दोन गोष्टींनाच आपले जीवन अर्पण केले आहे. नवीन लेखकांना उत्तेजन देणे, त्यांना त्यांच्या पुस्तका प्रकाशनाच्या कामात विविध प्रकारची मदत करणे या गोष्टी ते अव्याहतपणे करत असतात. ‘दुसऱ्याचा छंद तो माझा छंद’, असे समजून त्याला त्या त्या विषयाची माहिती पुरवणे, हा एक त्यांचा आवडता छंद आहे. विद्यार्थ्यांनी पाठांतर, शुद्धलेखन, शब्दकोशांचे वाचन, म्हणी, वाक्प्रचार यांचा कसून अभ्यास करावा, असा त्यांचा कटाक्ष असतो. यामुळे व्यक्तिगत विकासात वाढ होते. वृत्तपत्रांतील विविध विषयांची कात्रणे जमवणे, विनोद, उत्तमोत्तम लेख यांची हजारो कात्रणे व विविध प्रकारच्या माहितीने २५ वह्या त्यांच्या भरलेल्या आहेत. महाराष्ट्रातील हजारो वाचकांना, साहित्य संस्थांना, ग्रंथालयांना, ग्रंथविक्रेत्यांना त्यांनी जुन्या - नव्या पुस्तकांची माहिती वेळोवेळी कळवली आहे. आजवर अशी ५० हजारांहून अधिक पत्रे त्यांनी लिहिली आहेत. सध्या ते ‘संख्या - संकेतकोश’ (प्रसाद प्रकाशन), त्रैभाषिक कोशाचे ‘शब्दानंद’ (सं. सौ. सत्वशीला सामंत’, ‘धर्मयज्ञ’ हे मासिक (मिरजहून प्रसिद्ध होणारे), ‘आत्मवेध’ (आत्मकथन - अवधून हर्डीकर), ‘संध्या समालोचन’, ‘शंकर दिग्विजय’ इ. अनेक ग्रंथांचा मोठ्या हिरीरीने प्रसार करत आहेत. अशा या कर्मयोग्याच्या सर्व छंदास ५० वर्षे पूर्ण झाली आहेत. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन व वाढदिवसाच्या शुभेच्छा!

**श्री. जयंत गोखले**
दै. सनातन प्रभात, सनातन आश्रम,
देवद, ता. पनवेल,
जि. रायगड - ४१०२०६.

●●●

श्री. शरद जोशी यांना वाढदिवसानिमित्त शुभाशीर्वाद! श्री. जोशी यांनी हाती घेतलेले ज्ञान प्रसाराचे काम ते अतिशय नि:स्वार्थीपणाने करत आहेत. त्यांच्याकडून पुढेही असेच ज्ञान प्रसाराचे काम नि:स्वार्थीपणे होत राहो व त्यांची प्रगती होवो, अशी प्रभुचरणी प्रार्थना करतो. - प. पू. परशराम पांडे महाराज, सनातन आश्रम, देवद, ता. पनवेल.

**दिशासाठी**

**आपले लेखन सहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्यापन विषयातील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे आपल्या अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी आपणाकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

साहित्य जगत

# गीतार्थ विलसित

**दिवाकर अनंत घैसास यांचे श्रीमद्भगवद्गीतेवरील स्वतंत्र ओवीरूप निरूपण :**

कृष्णभक्त दि. अ. घैसास (ए - २०१, अनंत सोसायटी, नं २, पेंडसेनगर, क्रास रोड नं. ५, डोंबिवली - पूर्व - ४२१ २०१, दूरध्वनी : ०२५१-६५०५८९) यांनी श्रीमद् भगवद्गीतेवरील अभूतपूर्व रसाळ ओवीरूप भाष्य ग्रंथ म्हणजे **'गीतार्थ विलसित'** होय. प्रकाशक आहेत दि. अ. घैसास व मित्र परिवार, द्वारा दि.अ. घैसास. मार्च २००९ मध्ये त्याची प्रथमावृत्ती प्रकाशित झालेली आहे.

श्री. घैसास हे एक सिद्धहस्त लेखक आहेत. आजवर त्यांनी सुमारे १७५ लहान मोठी पुस्तके लिहिली आहेत. त्यांतील जवळ जवळ सर्व ग्रंथ अध्यात्म या विषयावरील आहेत. जुने पौराणिक ग्रंथ हा त्यांच्या अभ्यासाचा, चिंतन, मननाचा विषय असून त्यावर त्यांनी प्रचंड लेखन केलेले आहे. त्यांनी लिहिलेल्या पुस्तकांची वानगीदाखल काही नावे - 'श्री. एकनाथ भागवत, कथासार 'श्री गुरुचरित्र कथामृत' (सहलेखक कामत), 'श्री हरि विजय कथामृत', 'दासबोध ऑफ समर्थ रामदास' व 'श्रीज्ञानेश्वरी' (ही दोनही इंग्रजीतील) प्रख्यात ज्योतिषी कृष्णमूर्ती यांच्यावरील त्यांची पुस्तके इ. ही सारी पुस्तके लोकप्रिय झालेली आहेत. त्यांची बरीचशी पुस्तके के. भि. ढवळे प्रकाशनाने (श्री समर्थसदन, पहिली भटवाडी, गिरगाव, मुंबई - ४, फोन नं. : ०२२-२३८५४८५३) प्रकाशित केलेली आहेत. या ढवळे प्रकाशनाचे ते हुकमी लेखक आहेत. आज वयाची ८० वर्षे उलटली तरीही त्यांचे चिंतन - मनन - लेखन अहोरात्र चालू असते.

**'गीतार्थ विलसित' :**

प्रस्तुत ग्रंथ लिहिण्याअगोदर त्यांचे गीतेवर दोन ग्रंथ प्रसिद्ध झालेले आहेत. पण त्यांत त्यांचे गद्य स्वरूपातील निरुपण आहे. प्रस्तुत ग्रंथात श्रीमद्भगवद्गीतेवरील स्वतंत्र ओवीरूप निरुपण आहे. (पृ. ४८०, देणगी मूल्य रुपये २००/-) १९७३ सालच्या शेवटच्या ४/५ महिन्यातच त्यांनी या ग्रंथाचे लेखन केलेले होते. पण ते प्रसिद्ध होण्याचा योग २००९ मध्ये आला. (त्यांच्या मित्रपरिवाराने जेव्हा या ग्रंथातील रसाळ ओव्या वाचल्या, तेव्हा ते या ग्रंथाच्या प्रेमातच पडले आणि तो पुस्तकरूपाने प्रसिद्ध व्हावा यासाठी द्रव्य सहाय्य जमा करून हा अमोल ग्रंथ प्रकाशात आणला. याबद्दल श्री. घैसास त्या मित्राचे ऋणी आहेत. ही मित्ररूपी भगवतांची आणि कृष्णरूपी मित्राची कृपाच आहे असे ते मानतात. गीतेतील १८ अध्यायांतील मूळ श्लोक, त्याचा अन्वय, त्याचा अर्थ व त्याचे ओवीरूप निरुपण अशी ग्रंथाची रचना आहे. अठराव्या अध्यायातील ६८०/८१ ओव्यांचे निरुपण असे आहे.

देवदानवाची मैत्री। सन्मार्गीची दूहपसत्री।

मंगलता राहो अहोरात्री। वर्षाव करीत ॥६८०॥

तेणे ज्ञानकर्म योगें श्रीकृष्ण भक्ति अनुरागे।

मोक्षथी आपण होऊनि अंगे। सृजना भेटो॥६८१॥

गीताप्रेमी अभ्यासकांनी हा ग्रंथ अवश्य संग्रही ठेवावा.

•••

# 'नोबेल आणि नोबेल पुरस्कार पुस्तक प्रेरणादायी'

''साऱ्या जगात'' नोबेल पुरस्काराविषयी मोठे कुतुहल आहे. लेखकानेच मनोगतात अगदी रास्तपणे म्हटले आही कीं एखाद्या पुरस्काराने किती उंची गाठावी की त्या

पुरस्काराच्या महानतेला दाद म्हणून त्या पुरस्कारालाच पुरस्कार दिला जावा! असे असून सुद्धा नोबेल फाउंडेशनकडील माहितीवर आधारित लिहिलेले पुस्तक मराठीत तरी अपवादानेच प्रसिद्ध झालेले असावे! ही उणीव अनिल चक्रदेव यांनी भरून काढलेली आहे. अवघे आयुष्यच संशोधनाला राहिलेल्या व मृत्यूनंतरही केवळ आपल्या नावाने दिल्या जाणाऱ्या पुरस्कारांमुळे जगात शांतता राखण्यात हातभार लावणारा, अनेक दिग्गज संशोधकांना या पुरस्काराद्वारे प्रेरणा देणाऱ्या अल्फ्रेड नोबेल यांची ओळख आज एक संशोधक वा यशस्वी उद्योजक म्हणून असण्यापेक्षा जगद्विख्यात नोबेल पुरस्काराचे जनक अशी आहे. अशा थोर व्यक्तीची व त्यांच्या नावे दिल्या जाणाऱ्या पुरस्कारांची परिपूर्ण माहिती असणारे हे पुस्तक आहे. भावी पिढीला विशेषत: विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारे आहे.'' असे प्रतिपादन ग्रंथप्रसारक शरद जोशी यांनी 'नोबेल आणि नोबेल पुरस्कार' या अनिल चक्रदेव लिखित या पुस्तकाचे प्रकाशन करताना केले.

येथील आरती प्रकाशनाने हे पुस्तक प्रसिद्ध केलेले आहे. श्री. शरद जोशी यांच्या हस्ते या पुस्तकाचे प्रकाशन झाले. सुरुवातीस आरती प्रकाशनाचे सुरेश देशपांडे यांनी सर्वांचे स्वागत व प्रास्ताविक केले. यावेळी जोशी पुढे म्हणाले, ''प्रत्येक पालकाने आपल्या मुलांच्या हाती हे पुस्तक जरूर द्यावे. ते वाचून मराठी वाचकांना की जगावेगळे करून दाखविण्याची प्रेरणा मिळेल. जगप्रसिद्ध 'स्ट्रॅटेजिक फोरसाईट ग्रुप' या संस्थेचे अध्यक्ष संदीप वासलेकर यांची विवेचक प्रस्तावना या पुस्तकास लाभली आहे. राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या राजकारणी मंडळींनासुद्धा या प्रस्तावनेच्या वाचनातून खूप काही शिकावयास मिळेल. एक उत्कृष्ट पुस्तक सादर केल्याबद्दल लेखक अनिल चक्रदेव व प्रकाशक सुरेश देशपांडे यांचे खास अभिनंदन करतो.''

●●●

## स्त्री शक्ती - एक प्रेरणादायी पुस्तक

डॉ. पुष्पलता शेटये (बी - ८, मोती मॅन्शन, २०१, खेतवाडी मेनरोड, गिरगाव, मुंबई -४) ह्या एक मनस्वी लेखिका आहेत. 'स्त्री शक्ती' हे एक छोटेसे पण उत्कृष्ट पुस्तक (पृ. ६८, मूल्य रु. ५०/-) त्यांनी लिहून स्वत:च प्रसिद्ध केलेले आहे. या पुस्तकात फ्लॉरेन्स नाइटिंगेल, डॉ. ॲनी बेझंट, पंडिता रमाबाई सरस्वती', सिस्टर निवेदिता, मादाम क्युरी, डॉ. मारिया मॉटेसरी, इेलन केलरय, मदर टेरेसा आणि इंदिरा गांधी या जगप्रसिद्ध कर्तृत्ववान महिलांची कर्तृव्यगाथा सांगितली आहे. या असामान्य कर्तृत्वाच्या स्त्रियांचा जीवनपट कल्पितापेक्षाही अधिक नाट्यपूर्ण असा आहे. जीवनातील अंधार दूर करण्याचा यशस्वी प्रयत्न करणाऱ्या त्या स्त्री - जीवनदीप आहेत. त्यामुळे हे पुस्तक विशेष प्रेरणादायी झालेले आहे. प्रत्येक मराठी माणसाने ते अवश्य वाचावे. विद्यार्थ्यांनी, शिक्षकांनी, शाळाशाळांच्या ग्रंथालयांनी ते आपल्या संग्रही अवश्य ठेवावे.

**'श्रीसंत तुकाराम : व्यक्तित्व आणि कवित्व' :**

डॉ. शेटये यांच्या पीएचडीचा विषय संतश्रेष्ठ तुकाराम हा होता. त्या प्रबंधावर आधारित त्यांचे 'श्रीसंत तुकाराम : व्यक्तित्व आणि कवित्व' हे उत्कृष्ट पुस्तक १९९८ मध्ये प्रसिद्ध झाले होते. त्याची नवी सुधारित आवृत्ती २००४ मध्ये प्रसिद्ध झाली. तीही आता संपण्याच्या मार्गावर आहे. हे पुस्तकही वाचनीय व संग्राहय आहे. जिज्ञासंनी डॉ. शेटये यांच्याशी संपर्क साधावा.

धन्यवाद.


**श्री. शरद जोशी (ग्रंथ प्रसारक)**
५, अमर कल्पतरू सोसायटी, देवी चौक,
शास्त्रीनगर, डोंबिवली - ४२१२०२
दूरध्वनी : ९५२५१२-४८६९६७

●●●

# ऑक्सफर्डच्या निसर्ग-इतिहास संग्रहालयाला भेट

*ऑक्सफर्डचे हे संग्रहालय अतिशय जगप्रसिद्ध आहे. श्री. आगरकर यांनी त्यांच्या प्रवाही शैलीत करून दिलेला हा परिचय - संपादक*

ठाण्याच्या प्राच्य विद्या अभ्यास संस्थेच्या वतीने भारतीय विद्यार्थ्यांसाठी इंग्लंडची शैक्षणिक सहल आयोजित करण्यात येते. या सहलीत ऑक्सफर्ड, केंब्रिज आणि लंडन या शहरांना भेटी देण्यात येतात. या तीनही शहरात पाहण्यासारखे खूप आहे. वस्तुसंग्रहालये, वाचनालये, बागा, संशोधन संस्था, कॉलेजेस यांची या शहरात रेलचेल आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सहलीचा पहिला पडाव बहुधा ऑक्सफर्ड असतो. मुंबईहून पहाटेला निघून ऑक्सफर्डला पोहोचेपर्यंत दुपार होते. पहिल्या दिवशी संध्याकाळी ब्राडस्टीट आणि हायस्ट्रीटवर पायी फिरून कोणते ठिकाण कोठे आहे याची विद्यार्थ्यांना कल्पना दिली जाते. दुसऱ्या दिवसापासून एकेका स्थळाला भेट देण्याचा कार्यक्रम असतो. भेट देण्याच्या ठिकाणांमध्ये समावेश होतो तो निसर्ग-इतिहास संग्रहालयाचा (Natural History Museum). आमची राहण्याची व्यवस्था ऑक्सफर्ड स्टेशनजवळ असणाऱ्या युथ होस्टेलमध्ये असते. तिथून या संग्रहालयाला पोहोचण्यासाठी साधारणपणे १५ मिनिटे लागतात. आपण संग्रहालयाच्या जवळ पोहोचतो तोच प्रशस्त पटांगणाच्या मागे दगडांनी बांधलेली एक सुंदर इमारत आपल्या नजरेस पडते. संग्रहालयाचे प्रवेशद्वार लहानसेच आहे. प्रवेशद्वारातून आत शिरताच संग्रहालयाचा प्रचंड विस्तार आपल्या लक्षात येतो.



**निसर्ग - इतिहास संग्रहालय**

संग्रहालयातील प्राण्यांच्या हाडांचे मोठमोठे सांगाडे आपले लक्ष वेधून घेतात. डायनासॉर आणि त्यासारख्या अजस्त्र प्राण्यांच्या शरीराचे ते सांगाडे आहेत. उत्खननातून सापडलेले एकेक हाड एकत्र करून ही रचना शास्त्रज्ञांनी तयार केलेली आहे. ऑक्सफर्ड विद्यापीठातील जीवशास्त्र विभाग या संग्रहालयातील वस्तूंची देखभाल करते. त्यांनीच ह्या सांगाड्यांची निर्मिती केलेली आहे. मोठमोठ्या प्राण्यांच्या शरीराशेजारी इतर लहान प्राण्यांच्या शरीराचे सांगाडे देखील तेथे ठेवलेले आहेत. चतुष्पाद प्राण्यांच्या शरीराची रचना कशी असते याची आपल्याला चांगली कल्पना या सांगाड्यांवरून येते.


सांगाड्यांच्या शेजारी वेगवेगळ्या काचेच्या पेट्यांमध्ये जगाच्या निरनिराळ्या भागातील प्राण्यांचे भुसा (मसाला) भरलेले शरीर ठेवलेले आहेत. त्यावरून वेगवेगळ्या प्रदेशातील प्राण्यांची आपल्याला चांगली माहिती मिळते. काचेच्या एका कपाटात समुद्रातील वेगवेगळ्या प्राण्यांचे नमुने ठेवलेले आहेत. दुसऱ्या एका कपाटात सरपटणारे प्राणी आहेत. तर तिसऱ्या एका कपाटात पक्षी आहेत. एका कपाटात वेगवेगळी फुलपाखरे पद्धतशीर रचून ठेवलेली आहेत. संग्रहालयातील मधल्या वाटेने आपण



**डायनॉसॉरचा सांगाडा**


जेव्हा पुढे पुढे जात असतो तेव्हा एका बाजूला प्राणी आणि दुसऱ्या बाजूला वेगवेगळी खनिजे ठेवलेली आपल्याला दिसतात. पृथ्वीच्या वेगवेगळ्या भागांत वेगवेगळ्या प्रकारचे खडक सापडतात. ते सगळे एकत्र आणून येथे ठेवलेले आहेत. कोणते खडक जगाच्या कोणत्या भागांत मिळतात याची माहिती खडकांच्या नमुन्याशेजारीच दिलेली आढळते. त्याचबरोबर वेगवेगळ्या प्रकारची धातुके देखील तेथे ठेवलेली आहेत. आपल्याला लोखंड, तांबे, चांदी, सोने हे धातू परिचयाचे आहेत. परंतु कोणत्या धातुकांपासून ती मिळवितात याची आपल्याला क्वचितच माहिती असते. येथे मात्र सगळ्या प्रकारची धातुके आपल्याला पाहायला मिळतात.

काचेच्या कपाटांच्या मागे जाऊन पाहावे तर वेगवेगळ्या प्रकारचे ग्रॅनाइटचे खडक आणि ते कापून पॉलीश केल्यावर कसे दिसतात त्यांचे नमुने ठेवलेले आहेत. त्याचबरोबर वेगवेगळ्या प्रकारचे संगमरवराचे खडक आणि ते कापून पॉलिश केल्यावर कसे दिसतात, याचे नमुने ठेवलेले आहेत. त्यांच्या शेजारीच अनेक प्रकारचे जीवाश्म ठेवलेले आहेत. समुद्रातील एखादा प्राणी मेल्यानंतर त्याचे शरीर मातीत गाडले जाते. त्यावर गाळ साचत जाऊन गाळाचे खडक बनतात. काही दिवसांनंतर प्राण्याचे शरीर कुजून जाते. परंतु दगडांना त्या प्राण्यांचा आकार येतो. त्यांना जीवाश्म असे म्हणतात. येथे असलेल्या जीवाश्मांमध्ये मासे, कासव या प्राण्यांबरोबरच शंख, शिंपले यांचे जीवाश्म देखील होते.



**जीवाश्म**

निसर्गातील काही खडक चकाकतात. अशा चकाकणाऱ्या नमुन्यांसाठी वेगळी व्यवस्था केलेली आहे. सगळ्या बाजूंनी पडदे टाकून एक लहानशी अंधार खोली (Dark Room) तयार करण्यात आलेली आहे. पडदा बाजूला करून आपण आत गेलो की वेगवेगळ्या रंगाचे चकाकणारे नमुने आपल्याला पाहायला मिळतात. त्यांतील



**चकाकणारे खडक**

खरे सुख महाग नसते, पण खोट्या सुखासाठी आपणच खूप खर्च करत राहतो.

काही जांभळ्या रंगाचे, काही लाल रंगाचे, काही पिवळ्या रंगाचे तर काही निळ्या रंगाचे नमुने आहेत. रंगीबेरंगी दगड पाहातच राहावे असे वाटते. परंतु इतर अनेक गोष्टी बघायच्या असल्याने आम्ही अंधार खोलीतून बाहेर पडलो. अंधार खोलीच्या जवळच न्यूटन, आर्किमिडीज, डार्विन इत्यादी प्रसिद्ध शास्त्रज्ञांचे पुतळे आहेत. त्याचबरोबर लेब्निट्स, पायथॅगोरस, युक्लीड या गणितज्ञांचे पुतळेदेखील आहेत. या सगळ्यांमध्ये उठून दिसतात त्या खांबावर लावलेल्या वनस्पतींच्या प्रतिकृती. संग्रहालयाची संपूर्ण इमारत लोखंडी खांबांवर उभी आहे. या प्रत्येक खांबाच्या वरच्या टोकाला धातूच्या मदतीने वेगवेगळ्या वनस्पतींच्या प्रतिकृती करून लावलेल्या आहेत. इमरातीचे छप्पर बरेच उंच असून ते पारदर्शक काच आणि प्लॅस्टिकने बनविलेले आहे. त्यामुळे बाहेरचा सूर्यप्रकाश आत येऊन आतल्या वस्तू उजळून टाकतो. दिवसा विजेचे दिवे लावावेच लागत नाही. ऊर्जा बचतीचा हा मार्ग वाखाणण्यासारखा आहे.

संग्रहालय प्रामुख्याने तळमजल्यावर आहे. परंतु इमारतीला सर्व बाजूंनी गॅलरी आहे. या गॅलरीत देखील अनेक वस्तू ठेवलेल्या आहेत. उजव्या बाजूकडच्या गॅलरीत आपण गेलो तर आपल्याला वेगवेगळ्या प्रकारचे कीटक पाहायला मिळतात. यांतील बरेचसे कीटक जिवंत होते. त्यांना नैसर्गिक स्थितीत ठेवण्यासाठी योग्य ती व्यवस्था केलेली आहे. जेथे जीवंत कीटक ठेवता आले नाही तेथे त्यांचे मृत शरीर ठेवलेले आहे. फुलपाखराचे अनेक नमुने येथे ठेवलेले आहेत. कीटकांचे विश्व किती अजब आहे याची आपल्याला येथे कल्पना येते. गॅलरीतून आपण जसे पुढे जातो तसे आपल्याला अनेक प्रकारचे खडक पाहायला मिळतात. या सदरातून आम्ही जरा घाईने बाहेर पडलो. याचे कारण संध्याकाळ होण्याच्या आधी आम्हाला शेजारचे आणखी एक संग्रहालय पाहायचे होते. एक संपूर्ण कपाट डोडो पक्षांसाठी देण्यात आलेला आहे. डोडो नावाचा पक्षी हिंद महासागरातील मॉरिशस बेटावर आढळत असे. तेथून



**पशुपक्ष्यांचे भुसा (मसाला) भरलेले नमुने**

एक पक्षी एका ब्रिटीश माणसाने ऑक्सफर्डला आणला होता. त्याने त्या पक्षाची योग्य काळजी घेतली. तरीही कालांतराने तो मरण पावला. तोपर्यंत मॉरिशस बेटावरील डोडो पक्षीदेखील नामशेष झाले. याचे कारण डोडोनट या वृक्षांची प्रचंड प्रमाणात झालेली तोड होय. नामशेष झालेला डोडो पक्षी नेमका कसा होता याची कल्पना येण्यासाठी त्याच्या शरीरात मसाला भरून ते येथे ठेवण्यात आले आहे. त्याचबरोबर त्या पक्ष्याबद्दलची सर्व माहिती या कपाटात दिलेली आहे. ती फारच उद्बोधक आहे.

**डॉ. सुधाकर आगरकर**
सी-१४, विसावा वैभव नगरी,
कल्याण शीळ रोड,
काटई, ता. कल्याण
जि. ठाणे - ४२१२०४

●●●

*हे ईश्वरा, सर्वांना सुखात, आनंदात ठेव.*
*त्यातच माझे सुख सामावले आहे.*
*- एक प्रार्थना.*

# परिसरवार्ता

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर (मा. वि.)

मार्च २००९ चा शालान्त परीक्षेचा निकाल ९२.५७% लागला. २८३ पैकी २६२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

शाळेतील गुणानुक्रमे पहिले १० क्रमांक व विषयातील १ ल्या क्रमांकाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

**गुणानुक्रमे प्रथम १० क्रमांक :**

| गुणानुक्रम | विद्यार्थ्याचे नाव | गुण | टक्के |
|---|---|---|---|
| १ | इनामदार, अद्वैत संजय | ६११ | ९४.०० |
| २ | देवकर, मयुर विवेक | ६०९ | ९३.६९ |
| ३ | बांबरकर, कौस्तुभ विलास | ६०८ | ९३.५३ |
| ४ | रावण, पूर्वा संजय | ६०५ | ९३.०७ |
| ५ | गणमे, अमेय सिद्धेश्वर | ५९९ | ९२.१५ |
| ६ | प्रभुदेसाई, श्वेता रामदास | ५९६ | ९१.६९ |
| ७ | शेलार, वर्षा अरुण | ५९२ | ९१.०७ |
| ८ | फलके, प्रियांक सुरेश | ५८९ | ९०.६१ |
| ९ | सकपाळ, प्रमोदिनी सतीश | ५८८ | ९०.४६ |
| १० | ठुबे, उन्नती नवनाथ | ५८७ | ९०.३० |

**विषयांतील सर्वप्रथम क्रमांक :**

| विषय | विद्यार्थ्याचे नाव | गुण/पैकी |
|---|---|---|
| मराठी | ठुबे, उन्नती नवनाथ | ८९/१०० |
| | इनामदार, अद्वैत संजय | ८९/१०० |
| हिंदी | सावंत, राहुल विजय | ८८/१०० |
| | म्हात्रे, शिवानी संभाजी | ८८/१०० |
| संस्कृत | बांबरकर, कौस्तुभ विलास | ९८/१०० |
| | देवकर, मयुर विवेक | ९८/१०० |
| | इनामदार, अद्वैत संजय | ९८/१०० |
| इंग्रजी | तासगावकर, देविका संजय | ९१/१०० |
| गणित | देशपांडे, निरज बाळासाहेब | १४८/१५० |
| | बांबरकर, कौस्तुभ विलास | १४८/१५० |
| | रावण, पूर्वा संजय | १४८/१५० |
| विज्ञान | देवकर, मयुर विवेक | ९८/१०० |
| समाजशास्त्र | देवकर, मयुर विवेक | ९७/१०० |

**निकालाचे श्रेणीनुसार वर्गीकरण :**

१. विशेष श्रेणी ७५% च्या वर - ८१ विद्यार्थी

२. प्रथम श्रेणी ६०% ते ७४% - ९१ विद्यार्थी

३. द्वितीय श्रेणी ४५% ते ५९% - ६९ विद्यार्थी

४. तृतीय श्रेणी ३५% ते ४४% - २१ विद्यार्थी

**डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग, गौरव क्षण :**

☺ २० एप्रिल ते २० मे या कालावधीत इयत्ता १० वी चे उन्हाळी वर्ग घेण्यात आले.

☺ मे २००९ मध्ये आयोजित आठवीच्या नवीन अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण शिक्षकांनी पूर्ण केले.

☺ मंगळवार दि. १६ जून ते शनिवार दि. २० जून या कालावधीत सर्व शिक्षक व शिक्षकेतरांसाठी मा. मुख्याध्यापिका सौ. उषा कळमकर यांनी 'नागरी संरक्षण' या विषयाचे सरकारमान्य प्रशिक्षण आयोजित केले होते. हा अभिनव, स्तुत्य व समाजोपयोगी उपक्रम राबवून त्यांनी सामाजिक बांधीलकीची जाण सर्वांमध्ये निर्माण केली.

☺ महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षेत अद्वैत संजय इनामदार (१० अ) मुलाखतीसाठी निवडला गेला.

☺ कुणाल शाम मोहिते (९ ड) यास महाराष्ट्र राज्य हौशी ॲक्वेटीक असोसिएशन आयोजित राज्य स्तरीय जलतरण स्पर्धेत २०० मीटर बटरफ्लाय स्पर्धा प्रकारात सुवर्ण पदक मिळून राष्ट्रीय पातळीवरील जलतरण स्पर्धेसाठी महाराष्ट्रातून निवड झाली.

☺ मंगळवार दि. २३ जून रोजी पाचवीच्या विद्यार्थ्यांचे माध्यमिक विभागात स्वागत करण्यात आले. मा. मुख्याध्यापिका सौ. उषा कळमकर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांना पुढील शैक्षणिक वर्षांसाठी शुभेच्छा दिल्या.

☺ १५ जून रोजी ५ वी व ८ वी अ,ब,क वर्गांसाठी जीवन विद्या अकादमीच्या 'जीवन विज्ञान' शिबिराचे आयोजन केले गेले. यात जीवनातील छोट्या-छोट्या परंतु महत्त्वपूर्ण गोष्टींना रूचीपूर्ण व वैज्ञानिक पद्धतीने विश्लेषित करून योगासने व प्राणायामाला प्राधान्य दिले गेले.

☺ शनिवार दि. २७ जून रोजी पालक - शिक्षक संघटनेची स्थापना झाली. प्रसिद्ध समुपदेशिका सौ. मधुरा बापट यावेळी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या.

☺ महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठान निर्मित व शिवशाहीर श्रीमंत बाबासाहेब पुरंदरे लिखित व दिग्दर्शित 'जाणता राजा' या अतिभव्य नाट्यप्रयोगाच्या वाशी - नवी मुंबई मालिकेत ६ ब मधील कु. विठ्ठल भागवत कामठे याने दि. ९ डिसें. ते १४ डिसें. २००८ या कालावधीत कलाकार (बालशिवाजी) म्हणून भाग घेतला. याबद्दल त्याला महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठानतर्फे दि. २५ जून रोजी प्रशस्तिपत्र देवून गौरविण्यात आले.

☺ शाळेचा शालान्त परीक्षा मार्च २००९ चा निकाल ९२.५७% लागला असून २८३ पैकी २६२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.


☺ दि. १ जुलै रोजी जिल्हा ठाणे भारत स्काऊट गाईड विभागातर्फे आयोजित वृक्षदिंडीत ८ वी क चे ५० स्काऊट गाईडस् विद्यार्थी सहभागी झाले.

## सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्रजी माध्यम शाळा (माध्यमिक विभाग)

**मार्च २००९ च्या शालान्त परीक्षेचा निकालः**

कु. तेजल प्रधान ही विद्यार्थिनी ९६.१५% - ६२५/६५० गुण मिळवून शालान्त परीक्षेच्या गुणवत्ता यादीत सर्वसाधरण गटात, तसेच मुलींमध्ये तिसऱ्या क्रमांकावर झळकली आहे.

| | | |
|---|---|---|
| एकूण विद्यार्थी | - | १९५ |
| परिक्षेला बसलेले विद्यार्थी | - | १९५ |
| उत्तीर्ण विद्यार्थी | - | १९५ |
| टक्केवारी | - | १००% |
| ९० टक्के व जास्त | - | ४८ |
| ८० ते ९०% | - | ५६ |
| ७० ते ८०% | - | ३४ |
| ६० ते ७०% | - | ३८ |
| ५० ते ६०% | - | १८ |
| ४९ पेक्षा कमी | - | ०१ |
| | | १९५ |






**तेजल प्रधान**

**शाळेतील गुणानुक्रमे पहिले दहा :**

| नाव | गुण | टक्केवारी |
|---|---|---|
| १. तेजल प्रधान | ६२५ | ९६.१५ |
| २. आमला भागवत | ६२४ | ९६.०० |
| ३. ऋचा ठकार | ६२० | ९५.३८ |
| ४. मिताली शेट्टी | ६२० | ९५.३८ |
| ५. आदीती कुलकर्णी | ६१६ | ९४.७६ |
| ६. गौतमी जोशी | ६१५ | ९४.६१ |
| ७. प्रथमेश बायकेरीकर | ६१३ | ९४.१५ |
| ८. अनुश्री वैद्य | ६०९ | ९३.६९ |
| ९. स्वानंद वळामे | ६०९ | ९३.६९ |
| १०. तन्मयी चिपळूणकर | ६०८ | ९३.५३ |
| ११. आदित्य रानडे | ६०७ | ९३.३८ |

**विषयांतील सर्वप्रथम क्रमांक :**

| विषय | विद्यार्थ्याचे नाव | गुण |
|---|---|---|
| इंग्रजी | तेजल प्रधान | ९१ |
| संस्कृत | ऋचा ठकार | ९८ |
| | सिद्धार्थ नंदी | ९८ |
| | गंधार सूर्यवंशी | ९८ |
| | प्रथमेश बायकेरीकर | ९८ |
| | तेजल प्रधान | ९८ |
| | आमला भागवत | ९८ |
| | आदीती कुलकर्णी | ९८ |
| हिन्दी | ओंकार राडये | ८६ |
| मराठी | तेजल प्रधान | ९३ |
| गणित | आदीती कुलकर्णी | १४९ |
| विज्ञान | आमला भागवत | १०० |
| समाज शास्त्र | आमला भागवत | ९९ |

**फेब्रु. २००९ - टिळक विद्यापीठ गणित परीक्षेचा निकाल :**

१००% निकाल लागला.

एखाद्या गोष्टीचा आरंभ व शेवट कधी करावा, हे समजणे म्हणजेच अक्कल.

| इयत्ता | ५ वी | ६ वी | ७ वी |
|---|---|---|---|
| परिक्षेला बसलेले विद्यार्थी | ३१ | २१ | ०५ |
| प्राविण्यासह उत्तीर्ण | ०९ | ०३ | ०२ |
| प्रथम श्रेणीसह उत्तीर्ण | १५ | १५ | ०३ |
| द्वितीय श्रेणीसह उत्तीर्ण | ०५ | ०३ | -- |
| तृतीय श्रेणीसह उत्तीर्ण | ०२ | -- | -- |

**सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे :**

| इयत्ता | नाव | गुण |
|---|---|---|
| ५ वी | पार्थ पाटणकर | ९५ |
| ६ वी | विराज महाडीक | ९३ |
| ७ वी | नेहा पुसाळकर | ९७ |

**फेब्रु. २००९ - टिळक विद्यापीठ संस्कृत परीक्षेचा निकाल :**

१००% निकाल लागला.

| | द्वितीय परीक्षा | तृतीय परीक्षा | चतुर्थ परीक्षा |
|---|---|---|---|
| परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | ०७ | ०५ | १२ |
| विशेष प्रवीण्य प्राप्त विद्यार्थीची संख्या | ० | ०१ | ०४ |
| प्रथम श्रेणी प्राप्त विद्यार्थ्यांची संख्या | ०२ | ०४ | ०८ |
| द्वितीय श्रेणी प्राप्त विद्यार्थ्यांची संख्या | ०२ | ०० | ०० |
| तृतीय श्रेणी प्राप्त विद्यार्थ्यांची संख्या | ०३ | ०० | ०० |

**सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या इ. ७ वीच्या विद्यार्थ्यांची नावे :**

| | नाव | गुण |
|---|---|---|
| तृतीय परीक्षा | अक्षय छिद्रवार | ८५ |
| चतुर्थ परीक्षा | शिवानी फडके | ८७ |
| | अक्षत मोहारीर | ८६ |
| | मैत्री सत्रा | ८५ |
| | प्राची जैस्वाल | ८५ |

❖ ११ वी च्या ऑनलाईन प्रवेशासंबंधी संपूर्ण माहिती देण्याकरिता मंगळवार, दि. १६.६.०९ रोजी दहावीच्या मार्च २००९ मध्ये झालेल्या परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांची व त्यांच्या पालकांची सभा आयोजित करण्यात आली होती. यासंबंधी परिपत्रक ही देण्यात आले.

❖ शनिवार दि. २० जून २००९ रोजी इंग्लंड येथे शैक्षणिक दौरा केलेल्या आपल्या दहावीच्या विद्यार्थ्यांचा परिसंवाद आयोजित केला गेला. यामध्ये त्या विद्यार्थ्यातर्फे आपले अनुभव छायाचित्रांसहित सादर केले गेले.

❖ सोमवार २२ जून २००९ रोजी वायुदलामधून अभियांत्रिकी शाखेतील प्रथम आलेली ठाण्यातील कु. अक्षता भोळे व डेहराडून येथील सैनिकी शाळेतून प्रथम आलेला कु. गौरव म्हात्रे या दोघांची मुलाखत आयोजित करण्यात आली होती. स्पर्धात्मक परीक्षा व सैनिकी शिक्षण या विषयी माहिती देऊन मुलांच्यात स्पर्धात्मक जीवनाची जाणीव करून देणे हा या मुलाखतीचा उद्देश होता.

## जोशी - बेडेकर महाविद्यालय

महाविद्यालयातून बारावी (मार्च २००९) च्या परिक्षेस बसलेल्या विद्यार्थ्यांचा निकाल पुढीलप्रमाणे लागला.

**कला शाखा :**

| क्रमांक | नाव | गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| प्रथम | टांक, वंदना मुकेश | ४८८ | ८१.३३% |
| | नाडकर्णी, मोहिनी दत्तात्रय | ४८८ | ८१.३३% |
| द्वितीय | पांड्ये, अभिषेक राजेंद्र | ४५३ | ७५.५०% |
| तृतीय | वीरकर, हर्षद संजय | ४२७ | ७१.१७% |

या परीक्षेस बसलेल्या ३०६ विद्यार्थ्यांपैकी विशेष प्रावीण्यासह ४, प्रथम श्रेणीत ३५, द्वितीय श्रेणीत १०३ तर उत्तीर्ण श्रेणीत ५२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. दोन विद्यार्थी अनुपस्थित होते, तर ११० जण अनुत्तीर्ण झाले.

या शाखेचा एकूण निकाल ६३.८१% इतका लागला.

**वाणिज्य शाखा :**

| क्रमांक | नाव | गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| प्रथम | जमबिगी, क्षमा शेषगिझी | ५१७ | ८६.१७% |
| द्वितीय | साटले, कामिनी रामचंद्र | ५१५ | ८५.८३% |
| तृतीय | शेख, मिसबाह इरफान | ५१० | ८५.००% |

या परीक्षेस बसलेल्या ५९१ विद्यार्थ्यांपैकी विशेष प्रावीण्यासह ४२, प्रथम श्रेणीत २२२, द्वितीय श्रेणीत २००, उत्तीर्ण श्रेणीत ३० विद्यार्थी उत्तीर्ण झाले. तीन विद्यार्थी अनुपस्थित होते. तर ८४ जण अनुत्तीर्ण झाले.

या शाखेचा एकूण निकाल ८४.०१% इतका लागला.

**तृतीय वर्ष वाणिज्य :**

मार्च २००९ मध्ये मुंबई विद्यापीठातर्फे घेण्यात आलेल्या तृतीय वर्ष वाणिज्य शाखेचा निकाल

**महाविद्यालयाचा निकाल** ७०.३७%

| | |
|---|---|
| १. कु. शेट्टी, शरतकुमार कुट्टी | ८३.१४% |
| २. कु. पुजारी, पुष्पा नारायण | ८२.२८% |
| ३. कु. अणवेकर, पुजा प्रदीप | ८२.००% |

## बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

**कनिष्ठ महाविद्यालय**

**प्रथम वर्ष कनिष्ठ महाविद्यालय (अकरावी) :**

या परीक्षेस एकूण ४९८ विद्यार्थी बसले होते.

| | | |
|---|---|---|
| विशेष प्रावीण्यासह | ९७ | (१९.४८%) |
| प्रथम श्रेणी | २१५ | (४३.१७%) |
| द्वितीय श्रेणी | १५१ | (३०.३२%) |
| उत्तीर्ण श्रेणी | २५ | (०५.०२%) |
| एकूण उत्तीर्ण | ४९८ | |
| टक्केवारी | ९८% | |

या परीक्षेत पुढील तीन विद्यार्थी प्रथम तीन क्रमांकावर झळकले.

| क्रमांक | नाव | गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | गुप्ता, रितु | ६३१ | ९०.१४% |
| २. | भट, युगा | ६१३ | ८७.५७% |
| ३. | चव्हाण, सायली | ६०७ | ८६.७१% |

**द्वितीय वर्ष कनिष्ठ महाविद्यालय (बारावी) :**

मार्च २००९ च्या या उच्च माध्यमिक शालान्त परीक्षेस महाविद्यालयातून ४७५ विद्यार्थी बसले होते. पुनर्परीक्षार्थी व खाजगी विद्यार्थी धरुन ५०१ जण बसले होते.

| | | |
|---|---|---|
| विशेष प्रावीण्यासह | - | ११२ |
| प्रथम श्रेणी | - | २०९ |
| द्वितीय श्रेणी | - | १२६ |
| उत्तीर्ण श्रेणी | - | ०९ |
| अनुत्तीर्ण | - | ४० |
| एकूण उत्तीर्ण (प्रथम बसलेले) | - | ४४७ |
| टक्केवारी (प्रथम बसलेले) | - | ९४.११ |

महाविद्यालयातून पुढील तीन विद्यार्थी गुणाक्रमाने प्रथम तीन क्रमांकावर झळकले.

| क्रमांक | नाव | गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | यादव, अभिलाषा | ५५२ | ९२.००% |
| २ | पाटील, शीतल | ५४६ | ९१.००% |
| ३ | रामपल्ली, राजशेखर | ५४२ | ९०.३३% |

**पदवी महाविद्यालय :**

**प्रथम वर्ष विज्ञान (एफ्. वाय)**

| | |
|---|---|
| परीक्षेस बसलेले विद्यार्थी | २६८ |
| उत्तीर्ण विद्यार्थी | १७४ |
| एटीकेटीसह उत्तीर्ण विद्यार्थी | २०३ |
| अनुत्तीर्ण विद्यार्थी | ६५ |
| निकाल | ६४.९२% |
| एटीकेटीसह निकाल | ७५.७४% |

**प्रथम तीन आलेले विद्यार्थी पुढीलप्रमाणे :**

| क्र. | नाव | विषयगट | गुण |
|---|---|---|---|
| १ | जोशी, कांचन | पी.एम.एस | ६२२/७०० |
| २ | बागडे, प्राजक्ता | सी.झेड.बायो | ६१५/७०० |
| ३ | खल्फे, नबिला | पी.एम्.सी | ६०२/७०० |

**द्वितीय वर्ष विज्ञान (एस. वाय्)**

| | |
|---|---|
| परीक्षेस बसलेले विद्यार्थी | २३० |
| उत्तीर्ण विद्यार्थी | २१५ |
| एटीकेटीसह उत्तीर्ण विद्यार्थी | २२६ |
| अनुत्तीर्ण विद्यार्थी | ०४ |
| निकाल | ९३.४७% |
| एटीकेटीसह निकाल | ९८.२६% |

**प्रथम तीन आलेले विद्यार्थी पुढीलप्रमाणे**

| क्र. | नाव | विषयगट | गुण |
|---|---|---|---|
| १ | देशमुख, निखत | पी.एम् | ६१४/७०० |
| २ | कुऱ्हाडे, निशिगंधा | एम् एस | ६१३/७०० |
| ३ | अन्सारी, हिना | पी सी | ५८७/७०० |

**तृतीय वर्ष विज्ञान (टी. वाय)**

मुंबई विद्यापीठातर्फे घेण्यात आलेल्या या परिक्षेच्या निकालाचा तपशील -

| | | | |
|---|---|---|---|
| एकूण विद्यार्थी | - | २६८ | |
| अनुत्तीर्ण | - | ०७ | |
| परीक्षेस बसलेले | - | २६२ | |
| प्रथम श्रेणी प्राप्त | - | ८१ | (३०.९१%) |
| द्वितीय श्रेणी प्राप्त | - | १०६ | (४०.४५%) |
| उत्तीर्ण श्रेणी प्राप्त | - | ०९ | (३.४३%) |

अनुत्तीर्ण - ६२ (२३.६६%)

अघोषित निकाल - ०४

एकूण टक्केवारी - ७४.८०%

महाविद्यालयातून प्रथम तीन क्रमांकवर पुढील विद्यार्थी झळकले.

| क्र. | नाव | विषय | गुण |
|---|---|---|---|
| १ | कान्हुरकर, अश्विनी | गणित | ६९१ |
| २ | दुभाषे, योगेश्वर | रसायनशास्त्र | ६६४ |
| ३ | राड्रिग्ज, रूफिना | रसायनशास्त्र | ६४६ |

**विषयांत प्रथम आलेले विद्यार्थी :**

| विषय | विद्यार्थी | गुण |
|---|---|---|
| रसायनशास्त्र | दुभाषे, योगेश्वर | ६६४ |
| रसायनशास्त्र | यादव, श्रीगणेश | ५६१ |
| गणित | कान्हुरकर, अश्विनी | ६९१ |
| संख्याशास्त्र | वारीक, आनंद | ६३८ |
| वनस्पतिशास्त्र | दांडेकर, निखत | ६३३ |
| प्राणिशास्त्र | पुसाळकर, वृषाली | ६३३ |

**माहिती तंत्रज्ञान विभागाचे निकाल :**

एफ्.वाय.बी.एस.सी सत्र दुसरे - एप्रिल २००९

परीक्षेस बसलेले विद्यार्थी १३५

उत्तीर्ण ११०

अनुत्तीर्ण ०५

उत्तीर्णांची टक्केवारी ९५.६२%

विशेष प्रावीण्यासह १८

प्रथम श्रेणी ३१

द्वितीय श्रेणी ५३

एटीकेटीसह ०८

**प्रथम तीन क्रमांक :**

| क्र. | नाव | गुण (७५० पैकी) |
|---|---|---|
| १ | शेख, नेहान | ६४५ |
| २ | दुबे, पूजा | ६२३ |
| ३ | गावडे, नेहा | ६१४ |

एस. वाय. बी. एस. सी. सत्र चौथे - एप्रिल २००९

परीक्षेस बसलेले विद्यार्थी - ११७

उत्तीर्ण - ११५

अनुत्तीर्ण - ०२

उत्तीर्णांची टक्केवारी - ९८.२९%

विशेष प्रावीण्यासह - १३


प्रथम श्रेणी - ४२

द्वितीय श्रेणी - ५३

एटीकेटीसह - ०७

**प्रथम तीन क्रमांक**

| क्र. | नाव | गुण (७५० पैकी) |
|---|---|---|
| १ | सावंत, पूनम | ५८७ |
| २ | पाटील, स्मिता | ५६६ |
| ३ | डिसूझा, ग्रेटा | ५५९ |



## *स्वप्न साकारत आहे...*

*हे स्वप्न नव्हे एका व्यक्तीचे ! ते आहे समाजातील विचारवंतांचे,*
*हे स्वप्न नव्हे महंमदी मनोऱ्याचे, ते आहे श्रमिक योजनांचे*
*हे स्वप्न नव्हे खुशालवंतांचे, नव्हे ते आरामितांचे*
*नसे ते फावल्या क्षणांचे, गुलजार गादीत विसावतांचे*
*ते असे अहर्निश श्रमांचे, तसे ते असे श्रमोपासकांचे,*
*सदा ध्येयध्यासीं मग्न त्यांचे !*
*हे स्वप्न नव्हे व्यक्तिवैभवाचे, नसे ते आत्मगौरवाचे,*
*ते असे समाजोन्नतीचे, असे ते युवागौरवाचे*
*हे स्वप्न न दिसे एका क्षणीं, न एका दिनीं,*
*न एके यामिनी*
*दिनरात्र मानसी स्फुरे, सतत निद्रानाशही तें करी !*
*हे स्वप्न नसे सानुले, नसे ते चौकटी बांधिले*
*ते असे, भव्यता जयाची महान, सीमा जयाची अस्मान !*
*हे स्वप्न जसे आमुचे, असावे तसे उपस्थितांचे,*
*मुदित मनीं सुस्वागत अपुलें करितां*
*स्वप्न दिसे साकारले*
*आणि हे स्वप्न कसे आहे ते पहा -*
*ओसाड भूमी कर्दमीं जिथे घाण*
*द्वीप साजिरे आज तेथे दृश्यमान*
*ज्ञानसूर्य येथे उगवला, अज्ञान अंधार लोपला,*
*दिनरात्र प्रकाश अर्पी, अस्त न जया कल्पिला.*
*भव्य वास्तू इथे साकारती, दृश्य जयाचें महान,*
*शिल्पही जयांचे विशेषज्ञान देखिती*
*मनी जे सुजाण,*

*दृश्य देखतां जाणवे भव्यता, प्रासाद जणूं सरस्वतीचा,*
*ज्ञानवीणा जिथे झंकारे सदासर्वदा,*
*बगीचे जिथे बहरती फुलाफुलांचे रंगरंगती,*
*उद्यानीं बहरती ताटवे, कारंजी जिथे फवारती.*
*युवायुवतींचे मग्न घोळके, स्वप्न रंगवितां मग्न जे मानसी*
*स्वप्न तयांचे आकार घेई, अनुरागप्रारंभ येथेच होई*
*आचार्य आणि प्राचार्य, सदा इथें रंगती*
*विज्ञानसत्रीं सदा जयांची वाहिली मती,*
*कलावंत, सरस्वतीचे तन्मणी, तसे वैज्ञानिक महान्,*
*इथे जन्मती प्रतिभा जयांची देदीप्यमान*
*भूदल-सागर-सैनिक, वायुपुत्रही इथे निर्मिती*
*शक्तियुक्ति जयांची भारतमातेप्रती*
*नवमानव, नवनागरिक, प्रयत्नीं इथे घडतसे*
*सत्य, शिव, सुंदर जयांचे अणुरेणीं वसे.*
*बालके तव शिशुमंदिरी दाखल होतां,*
*विद्यामंदिरी दौड तयाची न रोखितां*
*नवयुवक हा प्रवेशितां विद्येचे महाद्वार*
*स्वप्न आमुचे तयाभोवती होई साकार*
*नवयुवक हा भारतभूचा सुपुत्र व्हावा,*
*बुद्धि जयाची, शक्ति जयाची भारतभूचा ठेवा*

*- डॉ. वा. ना. बेडेकर*

**Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006**

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

(स्थापना : १ ऑगस्ट १९३५)

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना नौपाडा, ठाणे १९३५

## विद्या प्रसारक मंडळाच्या घटक संस्था

१) डॉ. बेडेकर विद्या मंदिर (प्राथमिक विभाग)
२) डॉ. बेडेकर विद्या मंदिर (माध्यमिक विभाग)
३) सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्रजी माध्यम विद्यालय (प्राथमिक विभाग)
४) सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्रजी माध्यम विद्यालय (माध्यमिक विभाग)
५) के. ग. जोशी कला महाविद्यालय व ना. गो. बेडेकर वाणिज्य महाविद्यालय
६) बाळकृष्ण नाईक बांदोडकर विज्ञान महाविद्यालय
७) वि. प्र. मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय
८) डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था
९) वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन
१०) वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन माहिती तंत्रज्ञान केंद्र
११) वि. प्र. मंडळाचे प्रगत अभ्यास केंद्र

## उपक्रम

- भावे राष्ट्रीय व्याख्यानमाला
- डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यान
- नारळीपौर्णिमा - संस्कृत दिन
- दिशा व्यासपीठ
- विद्या प्रसारक मंडळ - वर्धापनदिन
- ५ सप्टेंबर - दीक्षान्त समारंभ

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस् नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.